अटी व शर्ती - ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन

या अटी व शर्ती ("अटी") द्वारे ग्राहक आणि ॲक्सिस बँक यांच्या दरम्यान कराराची निर्मिती होते. मोबाईल बँकिंगद्वारे ॲक्सिस बँकने प्रदान केलेली विशिष्ट उत्पादने आणि सेवांच्या तरतुदींचे नियमन केले जाते. या अटी ॲक्सिस बँकेने वेळोवेळी नमूद केल्याप्रमाणे खालील अटी व शर्ती आणि अशा अन्य अटी व शर्तींव्यतिरिक्त आहेत आणि त्यांना वगळून नाहीत

- ॲक्सिस बँक प्रीपेड इन्स्ट्रुमेंट अटी व शर्ती
- ॲक्सिस बँक ग्राहक अधिकार धोरण
- ॲक्सिस बँक बचत खाते अटी व शर्ती
- ॲक्सिस बँक नेट बँकिंग अटी व शर्ती
- ॲक्सिस बँक तक्रार निवारण पॉलिसी अटी व शर्ती
- ॲक्सिस बँक ग्राहक भरपाई पॉलिसी बाबत बँकेच्या अटी व शर्ती
- ॲक्सिस बँक वचनबद्धता संहिता अटी व शर्ती

या अटी व शर्ती आणि ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनशी संबंधित अन्य प्राथमिक/निर्दिष्ट अटी व शर्तींमध्ये कोणतीही विसंगती असल्यास, या अटी व शर्ती लागू होतील.

व्याख्या:

या विभागात, संदर्भ अन्यथा सूचित करत नाही तोपर्यंत खालील शब्द आणि वाक्यांशांचा अर्थ त्यांच्या समोर दिल्याप्रमाणे आहे:

"मोबाईल बँकिंग" म्हणजे ग्राहकाच्या बचत /चालू खाते / मुदत ठेवी संदर्भातील माहिती प्राप्त करण्याची सुविधा तसेच बँकेकडून ग्राहकाच्या मोबाईल वर वेळोवेळी सल्ला दिल्यानुसार किंवा उपलब्ध करून दिल्यानुसार उत्पादने आणि/किंवा अन्य सेवांचा वापर करण्याची सुविधा. या दस्तऐवजात मोबाईल बँकिंग आणि मोबाईल बँकिंग सेवा हे शब्द परस्पर संयोगाने वापरले आहेत.

"मोबाईल फोन" म्हणजे सेल्युलर सर्व्हिस सबस्क्रायबरच्या मालकी/ताब्यात असलेला हँडसेट तसेच त्यास आवश्यक ॲक्सेसरीज, संलग्नित उपकरणे आणि इतर सॉफ्टवेअर.

"ग्राहक किंवा मी" म्हणजे बँकेसह खाते असलेली आणि बँकद्वारे प्रदान केलेल्या मोबाईल बँकिंग सेवेचा लाभ घेण्यासाठी बँकेद्वारे अधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती.

"वैयक्तिक माहिती" म्हणजे मोबाईल बँकिंग सेवेच्या संदर्भात मिळालेली ग्राहकाची माहिती.

योग्यता:

या सेवेसाठी ग्राहकाने ॲक्सिस बँकेकडे सुरक्षित चॅनल द्वारे एसएमएस बँकिंगसाठी त्याचा सध्याचा मोबाईल फोन नंबर नोंदणीकृत केलेला असावा. सदर सुविधा ग्राहकास तेव्हाच उपलब्ध होईल. जेव्हा तो/ती ॲप्लिकेशन डाउनलोड करेल त्याचा/तिचा एम-पिन सेट करेल. ही सुविधा केवळ पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या ग्राहकांनाच उपलब्ध करून दिली जाईल आणि ॲक्सिस बँकेच्या विवेकबुद्धीनुसार प्रदान केली जाईल आणि ॲक्सिस बँकेद्वारे ग्राहकांना पूर्वसूचना देऊन कधीही बंद केली जाऊ शकते.

नोंदणी:

मी सहमत आहे की, माझे ॲप्लिकेशन व्यवस्थित आढळले आणि संबंधित तपशील बँकद्वारे नोंदणीकृत असल्यासच मी मोबाईल बँकिंग सेवा वापरण्यास पात्र असेन. बँकेला कोणतेही कारण न देता माझे ॲप्लिकेशन नाकारण्याचे स्वातंत्र्य असेल. बँक वेळोवेळी ठरविल्यानुसार मोबाईल बँकिंगद्वारे ग्राहकास अशा सेवा प्रदान करण्यासाठी प्रयत्नशील राहील. प्रत्येक खात्यावर ग्राहकाची श्रेणी ऑफर केली जाऊ शकते आणि श्रेणीनुसार भिन्न असू शकणाऱ्या सेवांचा प्रकार ठरवण्याचा बँकेकडे अधिकार आहे. बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार मोबाईल बँकिंगद्वारे ऑफर केलेल्या सेवांमध्ये समावेश/हटवणी देखील करू शकते.

ॲक्सिस बँकेने समर्थित असणारी उपकरणे, सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म, आवृती, नेटवर्क, पद्धती आणि डाटा सेवा निवडण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. ॲक्सिस बँक नियमित अंतराने अधिकृतपणे समर्थित टूल्स, तंत्रज्ञान आणि आवृत्ती प्रकाशित करेल. ज्यामध्ये मोबाईल

बँकिंगच्या वापरासाठी लागू असलेल्या अटी व शर्ती असतील. ग्राहक सर्व वेळी या अटी व शर्तींचे पालन करेल. या प्रकाशित आवश्यकता पूर्ण करण्याचा किंवा मोबाईल बँकिंगमध्ये वापरण्यासाठी समर्थित नसलेल्या आवृत्त्यांमध्ये सुधारणा करण्याचा कोणताही प्रयत्न अनधिकृत वापर आणि या अटी व शर्ती कागदपत्राचे उल्लंघन मानले जाईल.

मी सहमत आहे की, बँकेच्या मोबाईल बँकिंग सेवा प्राप्ती करण्यासाठी मी केवळ माझा मोबाईल फोन वापरेल. मोबाईल बँकिंगसाठी बँकेत नोंदणीकृत असल्याप्रमाणे विशिष्ट मोबाईल फोन नंबरवरच ॲक्सेस माझ्यासाठी प्रतिबंधित आहे. मला समजते की मोबाईल बँकिंग पिन (एम-पिन) सुरक्षा मला खूपच महत्त्वाची आणि वैयक्तिकृत आहे. मी माझे एम-पिन गोपनीय ठेवले पाहिजे. कोणत्याही तृतीय पक्षाकडे सार्वजनिक करू नये. मी कोणत्याही ठिकाणी लिहिणार/नोंद करणार नाही. ज्याद्वारे अन्य कुणालाही माझा एम-पिन नंबरची ओळख पटेल. मला समजते की मी याचे अनुसरण करण्यात/पालन करण्यात अयशस्वी झाल्यास त्यातून उद्भवणाऱ्या परिणामांसाठी मी पूर्णपणे जबाबदार असेन. मी इतर कोणत्याही व्यक्तीला माझ्या मोबाईल फोनचा ॲक्सेस देऊ नये किंवा मोबाईल फोन दुर्लक्षित सोडू नये. मी कोणत्याही अनधिकृत मार्गाने बँकेच्या संगणकात संग्रहित केलेली खाते माहिती ॲक्सेस करण्याचा प्रयत्न करणार नाही किंवा इतरांना प्रयत्न करण्याची परवानगी देणार नाही.

मोबाईल बँकिंग ॲप्लिकेशनच्या नोंदणीच्या प्रक्रियेदरम्यान ग्राहकाला एम-पिन सेट करण्यास सांगितले जाईल आणि ग्राहकाला हा एम-पिन त्याच्या जोखीम व परिणामांच्या अधीन राहून कितीही वेळा बदलण्याचे स्वातंत्र्य असेल. ग्राहक अशा प्रकारे बदललेल्या एम-पिनची गोपनीयता राखण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असेल आणि अधिकृत ग्राहकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीद्वारे नमूद एम-पिनचा गैरवापर झाल्यास बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

मोबाईल बँकिंग सुविधेचा गैरवापर/अनधिकृत वापर यामुळे ग्राहकाला झालेल्या नुकसानीसह या संदर्भात बँक कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही. ग्राहकाने एम-पिन विसरल्यास, इंटरनेट बँकिंग अथवा डेबिट कार्डाच्या क्रेडेन्शियल्सच्या आधारे नवीन एम-पिन निर्धारित करण्याची सुविधा मोबाईल बँकिंग ॲप्लिकेशनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

इलेक्ट्रॉनिक मेल किंवा लिखित संप्रेषण यासारख्या अन्य कोणत्याही माध्यमांच्या वापराद्वारे किंवा त्याद्वारे मी बँकेला पुरवलेल्या माहितीच्या अचूकतेसाठी मी जबाबदार आहे. माझ्याद्वारे पुरवलेल्या चुकीच्या माहितीमुळे उद्‌भवणाऱ्या परिणामांसाठी बँक कोणतेही दायित्व स्वीकारत नाही. माझ्याद्वारे बँकेला पुरवलेल्या माहितीमध्ये त्रुटी असल्याचा मला संशय असल्यास, मी शक्य तितक्या लवकर बँकेला सूचना देईन. बँक सदर त्रुटी त्वरित दुरुस्त करण्यासाठी प्रयत्न करेल आणि त्या त्रुटीमुळे उद्‌भवलेले कोणतेही व्याज किंवा शुल्क समायोजित करेल. स्टेटमेंटचे सर्व आऊटपुट हे खातेचे ड्युप्लिकेट स्टेटमेंट आहेत आणि ते इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे तयार केले जातील आणि त्यामध्ये असलेली माहिती बँकेद्वारे राखलेल्या संगणकीकृत बॅक-अप सिस्टीममधून प्राप्त केली जाईल. स्टेटमेंटची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी बँक सर्व वाजवी पावले उचलेल. परंतु बँक कोणत्याही त्रुटीसाठी जबाबदार नाही, जे तिच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांमुळे होऊ शकते, जसे की प्रसारणात डाटा करप्ट होणे.

वैशिष्ट्ये:

ॲक्सिस मोबाईल ॲप अनेक वैशिष्ट्ये प्रदान करते. जी वेळोवेळी अद्ययावत केली जाऊ शकतात. मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

1. प्री लॉग-इन पेजवर बॅलन्स तपासणी सुविधा
2. टच आयडी/ फेस आयडी, फिंगरप्रिंट, एम-पिनच्या सहाय्याने लॉग-इन
3. एम-पिन रिसेट करणे
4. मर्यादा:
   a) पाहणे
   b) सुधारणा
5. खाते:
   a) खाते तपशील पाहणे
   b) तपशीलवार स्टेटमेंट पाहणे
   c) स्मार्ट स्टेटमेंट पाहणे (काही ग्राहकांसाठी)
   d) व्हर्च्युअल डेबिट कार्ड (काही ग्राहकांसाठी)

6. सेवा:

a) प्रोफाईल संबंधित सेवा अपडेट करणे (जसे पत्ता, केवायसी इ.)

b) गृह शाखा बदल

c) कर्ज संबंधित सेवा

d) चेकबुक संबंधित सेवा

e) कार्ड संबंधित सेवा

f) डू नॉट डिस्टर्ब कार्यक्षमता

g) पीआयएस (एनआरआय ग्राहकांसाठी)

7. कार्ड (क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, फॉरेक्स कार्ड):

a) कार्डसाठी अप्लाय करणे

b) कार्ड अपग्रेड

c) क्रेडिट कार्डवर कर्ज

d) कार्ड ऑफर

e) स्टेटमेंट पाहणे

f) ऑटो-पे

g) ईएमआय वरील बॅलन्स

8. डील्सचा लाभ

9. कॅशबॅक

a) वेन्सडे डिलाईट

b) डायनिंग डिलाईट

c) ईकॉम शॉपिंग

d) ऑफर्स

e) इन्स्टंट व्हाउचर

10. एज रिवॉर्ड

a) रिवॉर्ड पॉईंट्सचे रिडेम्पशन

b) ट्रॅव्हल एज

c) ई-व्हाउचर

d) रिवॉर्ड स्टोअर

11. वेअरेबल्स

a) वेअर अँड पे

12. फास्टॅग
   a) बॅलन्स लोडिंग
   b) फास्टॅगसाठी अप्लाय
13. बिलपे
   a) ऑटोपे वापरून बिलांचे ऑटोमॅटिक पेमेंट
   b) बिल निर्मिती अलर्ट आणि रिमाइंडर
   c) 20+ श्रेणींमध्ये 20k+ प्रमुख बिलर्स
14. पैसे पाठविणे
   a) आदाता - ॲक्सिस आणि अन्य बँक आदाता जोडणे
   b) ॲक्सिस आणि अन्य बँक आदात्यांना पैसे पाठविणे
   c) आयएमपीएस आणि एनईएफटी मोडद्वारे पैसे पाठविणे
   d) स्वयं - स्वयं खात्यामध्ये पैसे हस्तांतरण
   e) परदेशात पैसे पाठवा- परदेशात पैसे पाठविणे
   f) स्टँडिंग सूचनांद्वारे भविष्यातील तारखांसाठी पैसे पाठवणे नियोजित करणे
   g) पैसे पाठविण्याचा व्यवहार रेकॉर्ड तपासणे
   h) व्यवहार पावती डाउनलोड करणे आणि सामायिक करणे
15. यूपीआय
   a) यूपीआय देयकांसाठी ॲक्सिस किंवा अन्य बँक खाते लिंकिंग
   b) खालील पद्धतींद्वारे पैसे हस्तांतरण -
      i. कोणताही क्यूआर स्कॅनिंग
      ii. यूपीआय आयडी
      iii. यूपीआय नंबर
      iv. बँक खाते
   c) पैसे पाठविण्याची व्यवहार नोंदी तपासणी
   d) व्यवहाराची पावती डाउनलोड आणि सामायिक करणे पैशांची मागणी
   e) प्रलंबित विनंतीवर प्रक्रिया
   f) यूपीआय व्यवस्थापित करणे (क्यूआर कोड निर्माण करणे, खाते मॅनेज करणे, यूपीआय नंबर मॅनेज करणे आणि तक्रार स्थिती तपासणे)
   g) यूपीआय व्यवहार तपशील तपासणे
   h) यूपीआय लिंक केलेल्या खात्याचे खाते बॅलन्स तपासणे

i) यूपीआय व्यवहारांवरील विवाद नोंदवणे

16. कार्डलेस कॅश

a) डेबिट कार्ड वापरल्याशिवाय एटीएम/मर्चंटकडून कॅश विद्ड्रॉ

17. वैयक्तिकरण

a) ग्राहकांना संबंधित कार्यक्रमांची व सूचना (नज) यांची माहिती देणे

18. ठेवी:

a) ठेवी उघडणे

b) ठेवी बंद करणे (आंशिक विद्ड्रॉल/पूर्ण विद्ड्रॉल)

c) ठेवी तपशील पाहणे

d) व्याज प्रमाणपत्र डाउनलोड करणे

e) डिपॉझिट सल्ला डाउनलोड करणे

f) मॅच्युरिटी सूचना बदलणे

g) नॉमिनी तपशील बदलणे

19. कर्ज:

a) व्याज प्रमाणपत्र

b) थकीत देय

c) कर्ज तपशील

d) विलंब शुल्क

e) आंशिक देयक

20. लॉकर्स:

a) बुकिंग

b) स्टँडिंग सूचना बदलणे

c) बुकिंग रेकॉर्ड पाहणी

21. म्युच्युअल फंड:

22. व्यवहार आधारित:

a) लंपसम (नवीन आणि विद्यमान गुंतवणूकदार)

i. रिडेम्पशन

ii. स्विच

iii. एसआयपी

iv. एसटीपी (सिस्टीमॅटिक ट्रान्सफर प्लॅन)

v. एसडब्ल्यूपी (सिस्टीमॅटिक विद्ड्रॉल प्लॅन)

vi. एसआयपी थांबवणे

vii. एसआयपी पुन्हा सुरू करणे

b) गैर-व्यवहार आधारित:

i. अंतर्दृष्टी विभाग

ii. स्टेटमेंट्स

iii. मागील व्यवहार

iv. एसआयपी कॅल्क्युलेटर

v. स्कीम निहाय होल्डिंग्स

vi. एफएटीसीए आणि रिस्क प्रोफाईल अपडेट करणे

vii. पोर्टफोलिओ

viii. महिन्यासाठी एसआयपी शेड्यूल करणे

23. डिजिटल गोल्ड

a) लंपसम खरेदी

b) एसआयपी खरेदी (रुपये/ ग्रॅममध्ये खरेदी करणे)

c) सोने विक्री

d) डिलिव्हरी

e) ऑर्डर रेकॉर्ड पाहणे

24. सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी

a) लंपसम (एक वेळ गुंतवणूक)

b) एसआयपी मॉड्यूल

c) आधार लिंकिंग

d) स्टेटमेंट पाहणे

25. नॅशनल पेन्शन सिस्टीम

a) सबस्क्रिप्शन प्रकार (इंडिव्हिज्युअल/कॉर्पोरेट)

b) विविध पेन्शन फंड मॅनेजर्सची यादी

c) गुंतवणूक स्टाईल पर्याय (ऑटो/सक्रिय)

d) नॉमिनी घोषणापत्र

26. स्वतंत्र गोल्ड बाँड

  a) लाईव्ह ट्रांच दरम्यान गुंतवणूक करणे
  b) मागील व्यवहार पाहणे

27. फ्लोटिंग रेट सेव्हिंग्स बाँड

  a) गुंतवणूक
  b) गुंतवणूकीनंतर होल्डिंग्सचे प्रमाणपत्र (सॉफ्ट कॉपी/फिजिकल कॉपी) डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध पर्याय

28. डिमॅट

  a) 2 इन वन खाते उघडणे
  b) पोर्टफोलिओ

29. इन्श्युरन्स

  a) हेल्थ आणि लाईफ इन्श्युरन्ससाठी अप्लाय करणे

30. माझे विशेषाधिकार (केवळ काही ग्राहकांसाठी)

  a) हक्क आणि ऑफर पाहणे

ग्राहकाचे दायित्व:

मी सहमत आहे की मोबाईल बँकिंगचा ॲक्सेस माझ्या मोबाईल फोनद्वारे असेल आणि कोणताही व्यवहार, जो त्यातून उद्‌भवतो, मी सुरू केलेला असो किंवा नसो तरी तो माझ्याकडूनच झाला असे मानले जाईल. जर मी अटींचे उल्लंघन केले असेल किंवा खालील सारख्या निष्काळजी कृतींनी नुकसानात योगदान दिले असेल किंवा त्यास कारणीभूत असेन तर माझ्या खात्यामधील अनधिकृत व्यवहारांमुळे झालेल्या सर्व नुकसानासाठी मी उत्तरदायी असेन:

a. मोबाईल बँकिंग खात्यामधील अनधिकृत प्रवेश किंवा त्रुटीयुक्त व्यवहारांविषयी बँकेला सूचित न करणे.

b. मोबाईल फोन नंबर/सिम कार्ड बदलल्यास किंवा समाप्त झाल्यास, बदल/ समाप्ती विषयी बँकेला सूचित न करणे.

मला समजते की, माझा मोबाईल हरवल्यास किंवा तो चुकीच्या हातात पडल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उद्‌भवणाऱ्या कोणत्याही गैरवापरासाठी मी बँकेला नुकसानभरपाई द्‌यावी. या परिस्थितीत मला होणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी मी बँकेला जबाबदार धरणार नाही.

वरील नमूद केलेल्या कोणत्याही पासवर्डचा किंवा संबंधित सुविधेचा कोणताही अनधिकृत अथवा बेकायदेशीर वापर झाल्यास किंवा कोणताही फसवणूकपूर्ण अथवा चुकीचा निर्देश दिल्यास, त्याबाबत उद्‌भवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीस ग्राहकच बँकेसमोर उत्तरदायी राहील आणि त्यामुळे लागणारे सर्व आर्थिक शुल्क केवळ ग्राहकाद्‌वारेच देय असेल.

उपकरणामध्ये कोणत्याही अनधिकृत सुधारणा (जसे की "जेलब्रेक" किंवा "रूट" द्‌वारे) साठी ग्राहक पूर्णपणे जबाबदार आहे. ॲक्सिस बँक कोणत्याही वेळी आणि ग्राहकांना पूर्वसूचना न देता "जेलब्रेक" किंवा "रूटेड" उपकरणांची ॲक्सिस मोबाईल व्यवहार मर्यादा बदलण्यासाठी अधिकार राखून ठेवते.

ग्राहकाने येथे समाविष्ट अटी व शर्तींचे उल्लंघन केले असल्यास किंवा त्याच्या निष्काळजीपणामुळे नुकसान झाले असल्यास किंवा खात्यामधील कोणत्याही अनधिकृत प्रवेशामुळे किंवा याविषयी योग्य वेळेत बँकेला सूचित करण्यात अपयशी ठरल्यास झालेल्या सर्व नुकसानीसाठी ग्राहक स्वतःच जबाबदार असेल.

ॲक्सिस बँकेने मोबाईल फोन नंबरची पडताळणी आणि/किंवा ग्राहकाला ॲक्सिस बँकेद्‌वारे दिलेल्या एम-पिन, पासवर्ड, डेबिट कार्ड पिनच्या पडताळणीद्‌वारे किंवा ॲक्सिस बँकेच्या विवेकबुद्‌धीनुसार विहित केलेल्या पडताळणीच्या इतर कोणत्याही पद्‌धतीद्‌वारे ग्राहकाच्या प्रमाणीकरणाची पद्‌धत स्वीकारली आहे.

अनधिकृत ॲक्सेस आणि/किंवा वर नमूद केलेल्या प्रमाणीकरणाच्या पद्‌धतींचा वापर ग्राहकाच्या खात्याच्या सुरक्षेला जोखीम निर्माण करू शकतो. म्हणून, डिजिटल स्वाक्षरी व्यतिरिक्त इतर पडताळणी पद्‌धतींच्या वापराशी संबंधित कोणत्याही कायदेशीर जोखीमांना टाळण्यासाठी, ग्राहकांनी मोबाईल नंबर, एम-पिन, त्यांना प्रदान केलेले पासवर्ड आणि डेबिट कार्ड पिन यांसारख्या प्रामाणिकरण मापदंडांची संपूर्ण गोपनीयता, गुप्तता आणि संरक्षण

सुनिश्चित करणे बंधनकारक आहे; तसेच ॲक्सिस बँक आपल्या संपूर्ण विवेकाधिकारानुसार वेळोवेळी निर्धारीत करील अशा इतर कोणत्याही सत्यापन पद्धतीचेही संरक्षण ग्राहकांनी करणे आवश्यक आहे.

बँकेचे दायित्व:

जर नैसर्गिक आपत्ती, पूर, आग आणि इतर नैसर्गिक आपत्ती, कायदेशीर प्रतिबंध, दूरसंचार नेटवर्कमधील त्रुटी किंवा नेटवर्क अयशस्वी झाल्यास, एसएमएस डिलिव्हरी न झाल्यास, सॉफ्टवेअर किंवा हार्डवेअर त्रुटी किंवा बँकेच्या नियंत्रणाबाहेरच्या इतर कोणत्याही कारणास्तव ॲक्सेस उपलब्ध नसल्यास बँकेस मला उत्तरदायी ठरवले जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत बँकेवर कोणत्याही प्रकारच्या नुकसानीबाबत दायित्व राहणार नाही–ही हानी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, आनुषंगिक किंवा परिणामी स्वरूपाची असो–आणि उत्पन्नातील तोटा, गुंतवणूक, उत्पादन, सद्भावना, नफा किंवा व्यवसायातील व्यत्यय किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या अथवा स्वरूपाच्या नुकसानीवर आधारित कोणताही दावा असला, तसेच अशी हानी ग्राहकाला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस झाली असली, तरीदेखील बँक जबाबदार राहणार नाही. मोबाईल फोनशी संबंधित सीएसपी द्वारे प्रदान केलेल्या सेवांसाठी बँक कोणत्याही प्रकारे उत्तरदायी नाही. मोबाईल बँकिंग व्यवहाराशी संबंधित सीएसपी द्वारे आकारलेल्या शुल्कासाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार/उत्तरदायी नाही.

फिंगरप्रिंट आणि फेस प्रमाणीकरण अटी:

ग्राहकाला हे माहित आहे की फिंगरप्रिंट किंवा चेहरा ओळख वापरून व्यवहाराचे प्रमाणीकरण करणे ही संबंधित उपकरण/स्मार्टफोनची क्षमता आहे आणि त्या वैशिष्ट्याची अचूकता उपकरणाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. फीचर्सच्या कार्यवाही मधील कोणत्याही समस्यांसाठी बँक जबाबदार नाही. उपकरणांवरुन प्राप्त झालेल्या यशस्वी किंवा अयशस्वी संदेशाच्या आधारावर बँकेकडून व्यवहार प्रमाणित केले जातात.

ग्राहकाने स्वतःहून निर्णय घेऊन, मोबाईल बँकिंगला उपकरणाचे फिंगरप्रिंट आणि चेहरा सत्यापन हे वैशिष्ट्य वापरण्याची संमती दिली आहे. उपकरणावर समाविष्ट केलेला/नोंदणीकृत केलेला कोणताही फिंगरप्रिंट किंवा चेहरा वापरून मोबाईल बँकिंग ॲप्लिकेशनवर व्यवहार

करता येईल, याची ग्राहकास जाणीव आहे. तथापि, या व्यवहारामध्ये लॉग-इन करणे आणि लाभार्थी जोडणे यांचा समावेश केलेला नाही. मूळ ग्राहकाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने उपकरणावर तिचा/त्याचा फिंगरप्रिंट जोडून मोबाईल बँकिंगवर व्यवहार केल्यामुळे घडणाऱ्या कोणत्याही फसवणुकीसाठी बँक जबाबदार नसेल. ग्राहकाने हे सुनिश्चित केले पाहिजे की, त्याच्या/तिच्या उपकरणावर केवळ त्याचा/तिचाच फिंगरप्रिंट किंवा चेहरा जोडलेला/नोंदणीकृत केलेला असावा आणि या फिंगरप्रिंट प्रमाणीकरण वैशिष्ट्यात इतर कोणालाही ॲक्सेस नसावा.

वैयक्तिक माहितीचे प्रकटीकरण:

ॲप वापरून, तुम्ही आम्हाला (ॲक्सिस बँकेला) आमची उत्पादने सुधारण्यासाठी आणि तुम्हाला सेवा प्रदान करण्यासाठी उपकरणे आणि संबंधित सॉफ्टवेअर, हार्डवेअर आणि पेरिफेरल्स यांच्याविषयीची तांत्रिक माहिती आणि उपकरणांमध्ये संग्रहित कोणताही डाटा आणि माहिती, इंटरनेट-आधारित किंवा वायरलेस, संकलित करण्यासाठी आणि वापरण्यासाठी अधिकृत करीत आहात. ॲप्लिकेशन वापरून, तुम्ही बँकेला योग्य वाटल्याप्रमाणे आमचे कोणतेही एजंट, सेवा प्रदाता, सहयोगी किंवा इतर कोणत्याही तृतीय पक्षाला ही माहिती सामायिक करण्यास संमती देता. तुम्ही आमच्या सहयोगींना, एजंटना, सेवा प्रदात्यांना देखील तुम्हाला देऊ केलेल्या क्रेडिट स्कोअरिंग, तुम्हाला ऑफर केलेल्या सेवा निर्धारित करण्यासाठी किंवा ॲपचा वापर करताना किंवा वैधानिक आणि नियामक प्राधिकरणांना सादर करण्यासाठी आमच्या सेवा आणि/किंवा तुमचा अनुभव सुधारण्यासाठी सर्व उपरोक्त डाटा प्रसारित करण्यासाठी, संकलित करण्यासाठी, टिकवून ठेवण्यासाठी, राखण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी अधिकृत करीत आहात.

आम्ही तुम्हाला उत्कृष्ट अनुभव देऊ शकू यासाठी, आम्हाला ॲक्सेससाठी तुमच्या परवानगीची आवश्यकता आहे आणि ग्राहक जागरूकपणे खालील बाबींवर परवानगी देत आहे:

- लोकेशन: तुमच्या जवळील एटीएम/शाखा आणि ऑफर प्रदर्शित करण्यासाठी. फसवणूक टाळण्यासाठी तुमचे भौगोलिक लोकेशनचे संकलन आणि वापर करण्यासाठी. तुमच्या व्यवहारांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी तुमच्या लोकेशनचा डाटा वापरला जाईल.
- संपर्क: पैसे पाठविण्यासाठी किंवा रिचार्ज करण्यासाठी संपर्कांकडून फोन नंबर, ईमेल ॲड्रेस पुन्हा प्राप्त करण्यासाठी.

- फोटो आणि कॅमेरा: ॲपमध्ये जोडलेले खाते आणि आदाता वैयक्तिकृत करण्यासाठी
- फोन: ॲपमधून ॲक्सिस बँक ग्राहक सेवेला कॉल करण्याची अनुमती देण्यासाठी
- डिव्हाईस आयडी आणि स्थिती, मोबाईल नंबर (सिम) आणि एसएमएस पाठवणे सुविधा: फोनची स्थिती आणि ओळख वाचून तुमच्या खाते सुरक्षेसाठी तुमच्या डिव्हाईसवर आवश्यक सिम लॉकिंग करण्यासाठी
- कॅलेंडर: तुमची शेड्यूल्ड केलेली पेमेंट्स सिंक करण्यासाठी
- एसएमएस: ओटीपी/एमव्हीसी/डीव्हीसी संबंधित एसएमएस ऑटोमॅटिकरित्या वाचण्यासाठी. तसेच, वापरकर्त्यांच्या वतीने एसएमएस पाठवून फोनची पडताळणी करण्यासाठी याचा वापर केला जातो. व्यवहार अचूकता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने, फसवणूक टाळण्यासाठी आणि ग्राहक सहाय्य सुधारण्यासाठी बँकिंगशी संबंधित कीवर्ड (उदा., व्यवहार अलर्ट, वन-टाइम पासवर्ड) असलेले मेसेजेस वाचण्यासाठी. आम्ही कोणतेही वैयक्तिक संदेश स्टोअर किंवा शेअर करत नाही. एकदा दिलेली आरंभिक संमती डेटा संकलनाचे नियंत्रण करेल; हे प्राधान्य कंट्रोल सेंटरद्वारे कोणत्याही वेळी अपडेट केले जाऊ शकते. उपकरण सक्रिय केल्याच्या वेळेपासून आलेला एसएमएस डेटा सुरक्षितपणे संकलित केला जाईल. जेणेकरून फसवणूक ओळखता येईल आणि सुरक्षित पद्धतीने रोखता येईल.
- ॲप वापर डाटा: तुमचा अनुभव वाढविण्यासाठी आणि वैयक्तिकृत सेवा ऑफर करण्यासाठी, तुम्ही भाषेसहित तुमच्या डिव्हाईस वर आमचे आणि अन्य ॲप्ससह कसे संवाद साधता यावर आम्ही डाटा संकलित करू शकतो. हा डाटा आम्हाला फसवणूक टाळण्यास आणि कठोर गोपनीयता मापदंडांचे पालन करताना इष्टतम ॲप परफॉर्मन्स सुनिश्चित करण्यास मदत करेल.
- दूरसंचार किंवा इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग नेटवर्कमध्ये सहभागी होण्यासाठी कायदेशीर निर्देशनाचे पालन करण्यासाठी सांख्यिकीय विश्लेषण किंवा क्रेडिट रेटिंग या कारणांचा समावेश असलेल्या परंतु त्यांच्यापुरतीच मर्यादित नसलेल्या कारणांमुळे, बँकेने तृतीय पक्षाला वैयक्तिक माहिती उघड केल्यास ग्राहकास झालेल्या कोणत्याही नुकसानीसाठी बँक उत्तरदायी राहणार नाही.

आधार लिंकिंग संबंधित अटी:

बँक खातेशी लिंकेजसाठी आधार तपशील सादर करण्याद्वारे, ग्राहक खालील अटी व शर्तींशी सहमत आहेत:-

सरकारी लाभांसाठी आधार लिंक करणे:

मी माझा आधार नंबर सादर करीत आहे आणि स्वेच्छापूर्वक याकरिता संमती प्रदान करीत आहे:

- यूआयडीएआय मधून मला प्रमाणित करण्यासाठी माझा आधार तपशील वापर
- मला एसएमएस अलर्ट पाठविण्यासाठी बँक रेकॉर्डमधील माझा नोंदणीकृत मोबाईल नंबर वापर
- बँकसह असलेल्या माझ्या सर्व विद्यमान/नवीन/भविष्यातील खाते आणि ग्राहक प्रोफाईल (सीआयएफ) सह आधार नंबर लिंकिंग

मला माझ्या निवडक खात्यामध्ये भारत सरकारच्या (जीओआय) एलपीजी अनुदानासह थेट लाभ ट्रान्सफर (डीबीटी) प्राप्त करण्यास मला सक्षम करण्यासाठी एनपीसीआय मॅपरसह माझे निवडलेले खाते सीड करायचे आहे. मला समजते की जर एकापेक्षा जास्त लाभ हस्तांतरण मला देय असतील तर मला त्याच खात्यामध्ये सर्व लाभ हस्तांतरण प्राप्त होतात.

मला हे समजावून सांगण्यात आले आहे की बँकेकडे सादर केलेली माझी माहिती वर नमूद केल्याशिवाय किंवा कायद्याच्या आवश्यकतेनुसार असल्याशिवाय इतर कोणत्याही उद्देशासाठी वापरली जाणार नाही.

मी याद्वारे घोषित करीत आहे की माझ्याद्वारे स्वेच्छिकपणे सादर केलेली सर्व माहिती सत्य, अचूक आणि पूर्ण आहे

विनंती सादर करणे म्हणजे व्यवहाराची प्रक्रियाच करणे असे नाही, हे मला मान्य आहे. नियामक आणि अंतर्गत मार्गदर्शक तत्वांनुसार व्यवहार नाकारण्याचा ॲक्सिस बँकेकडे पूर्ण अधिकार आहे

मला समजते की ॲक्सिस बँक आधार आधारित प्रमाणीकरण आणि काही असल्यास खर्च पूर्ती उद्देशाने प्रदान केलेल्या वैयक्तिक ओळख डाटाची सुरक्षा आणि गोपनीयता सुनिश्चित करेल.

बँक खात्यासह आधार लिंकिंग:

मी माझा आधार नंबर सादर करीत आहे आणि स्वेच्छापूर्वक याकरिता संमती प्रदान करीत आहे:

- यूआयडीएआय मधून मला प्रमाणित करण्यासाठी माझा आधार तपशील वापर
- मला एसएमएस अलर्ट पाठविण्यासाठी बँक रेकॉर्डमधील माझा नोंदणीकृत मोबाईल नंबर वापर
- बँकसह असलेल्या माझ्या सर्व विद्‍यमान/नवीन/भविष्यातील खाते आणि ग्राहक प्रोफाईल (सीआयएफ) सह आधार नंबर लिंकिंग

मला हे समजावून सांगण्यात आले आहे की बँकेकडे सादर केलेली माझी माहिती वर नमूद केल्याशिवाय किंवा कायद्‍याच्या आवश्यकतेनुसार असल्याशिवाय इतर कोणत्याही उद्‍देशासाठी वापरली जाणार नाही.

मी याद्‍वारे घोषित करीत आहे की माझ्याद्‍वारे स्वेच्छिकपणे सादर केलेली सर्व माहिती सत्य, अचूक आणि पूर्ण आहे

विनंती सादर करणे म्हणजे व्यवहाराची प्रक्रियाच करणे असे नाही, हे मला मान्य आहे. नियामक आणि अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वांनुसार व्यवहार नाकारण्याचा ॲक्सिस बँकेकडे पूर्ण अधिकार आहे

मला समजते की ॲक्सिस बँक आधार आधारित प्रमाणीकरण आणि काही असल्यास खर्च पूर्ती उद्देशाने प्रदान केलेल्या वैयक्तिक ओळख डाटाची सुरक्षा आणि गोपनीयता सुनिश्चित करेल.

दुरुस्ती करण्याचा अधिकार

ॲक्सिस बँक स्पष्टपणे, कोणत्याही वेळी आणि ग्राहकांना पूर्वसूचना न देता, या कार्यक्रमाशी संबंधित अटींमध्ये भर घालण्याचा आणि/किंवा बदलण्याचा, सुधारण्याचा किंवा सर्व किंवा अंशतः बदल करण्याचा अधिकार राखून ठेवते.

शासित कायदा आणि अधिकारक्षेत्र

या अटी व शर्तींची संरचना, वैधता आणि कार्यप्रदर्शन सर्व बाबतीत भारताच्या कायद्यांद्वारे नियंत्रित केले जाईल. पक्षकार येथे मुंबई, भारत येथील सक्षम न्यायालयांच्या विशेष अधिकारक्षेत्राला मान्यता देतात, ज्यांना या प्रकरणातील सर्व बाबतीत इतर कोणत्याही न्यायालयांच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन न राहता न्यायसंगत अधिकार असेल, जरी इतर न्यायालयांना त्या प्रकरणातील तत्सम अधिकारक्षेत्र असले तरी. सेवा उपलब्ध असलेल्या भारताव्यतिरिक्त इतर कोणत्याही देशातील कायद्यांचे पालन न केल्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उद्भवणाऱ्या कोणत्याही दायित्वापासून ॲक्सिस बँक मुक्त असेल.

व्याख्या

जोपर्यंत संदर्भाच्या विसंगत असत नाही तोपर्यंत खालील शब्द आणि वाक्यांशांचा अर्थ या कागदपत्रात खाली स्थापित केल्यानुसार असेल:

"वॉलेट" किंवा **"ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन"** किंवा **"ॲक्सिस मोबाईल"** म्हणजे भारतातील ॲक्सिस बँकद्वारे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये ऑफर केलेला ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन पर्याय, या ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ॲक्सिस बँकद्वारे ऑफर केलेल्या विविध उत्पादने आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन ॲप स्टोअर आणि गूगल प्ले स्टोअरमधून iOS आणि अँड्रॉईड मोबाईल ऑपरेटिंग सिस्टीमसाठी डाउनलोड केले जाऊ शकते.

"खाते धारक" म्हणजे असा ग्राहक जो ॲक्सिस बँकेचा ग्राहक असून त्याच्याकडे कार्यान्वित बचत बँक खाते आहे. अनिवासी भारतीय (एनआरआय), विदेशी खाते धारक आणि अल्पवयीन या सेवेच्या नोंदणीसाठी पात्र नाहीत.

"खाते" म्हणजे ॲक्सिस बँकसह कोणत्याही ग्राहकाने व्यवस्थापित कार्यान्वित बचत बँक खाते, ज्याचे तपशील ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या नोंदणी किंवा प्रमाणीकरण प्रक्रियेच्या वेळी ग्राहकाने प्रदान केले आहेत आणि ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनवर ॲक्सिस बँकद्वारे ऑफर केलेले ॲक्सिस बचत खाते देखील समाविष्ट असेल.

"बँक" आणि **"ॲक्सिस बँक"** म्हणजे ॲक्सिस बँक लिमिटेड, कंपनीज अधिनियम 1956 अंतर्गत स्थापित आणि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, 1949 अंतर्गत बँक म्हणून परवानाधारक कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय 'त्रिशूल', 3रा मजला, समर्थेश्वर मंदिराच्या समोर, लॉ गार्डन, एलिस ब्रिज, अहमदाबाद 380 006, गुजरात आणि ॲक्सिस हाऊस, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, बॉम्बे डायिंग मिल्स कंपाउंड, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - 400 025 येथे आहे.

या संज्ञेत बँकेच्या कोणत्याही 'संलग्न' चा समावेश होतो ज्याचा अर्थ असा असेल आणि त्यात कोणत्याही अशा कंपनीचा समावेश असेल जी होल्डिंग कंपनी किंवा उपकंपनी किंवा बँकेच्या नियंत्रणाखाली असलेली कोणतीही व्यक्ती किंवा ज्यामध्ये बँकेचे अशा व्यक्तीच्या मतदान रोख्यांपैकी 26% पेक्षा जास्त थेट/ फायदेशीर हितसंबंध आहेत. या व्याख्येच्या उद्देशासाठी "नियंत्रण" जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात वापरले जाते तेव्हा त्याचा अर्थ अशा व्यक्तीचे व्यवस्थापन आणि धोरणे निर्देशित करण्याची शक्ती, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, मग ते मत धारण करण्याच्या सिक्युरिटीजच्या मालकीद्वारे, कराराद्वारे किंवा अन्यथा कसेही असो; आणि "व्यक्ती" म्हणजे कंपनी, कॉर्पोरेशन, भागीदारी, ट्रस्ट किंवा इतर कोणतीही संस्था किंवा संघटन किंवा इतर संस्था आहे.

"क्रेडिट कार्ड" म्हणजे ॲक्सिस बँकद्वारे जारी केलेले ग्राहकाचे ॲक्टिव्ह क्रेडिट कार्ड जे ग्राहकाच्या मोबाईल नंबरशी लिंक केलेले आहे किंवा भारतातील इतर कोणत्याही बँकद्वारे जारी केलेले आहे.

"डेबिट कार्ड" म्हणजे ॲक्सिस बँकेद्वारे खातेधारकाला जारी केलेले ग्राहकाचे ॲक्टिव्ह डेबिट कार्ड, जे ग्राहकाच्या मोबाईल नंबरशी लिंक केलेले आहे किंवा भारतातील इतर कोणत्याही बँकेद्वारे जारी केलेले आहे.

"इंटरनेट बँकिंग आयडी" म्हणजे ग्राहकाला देण्यात आलेला ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग ग्राहक आयडी ज्याद्वारे तो/ती www.axisbank.co.in वर होस्ट केलेल्या इंटरनेट बँकिंग पोर्टलद्वारे ॲक्सिस बँकने ऑफर केलेले उत्पादने आणि सेवा ॲक्सेस करू शकतात

“कायदा” यात कोणतेही संविधान, अधिनियम, कायदा, नियम, विनियम, अध्यादेश, न्यायनिर्णय, आदेश, डिक्री, अधिकृतता, तसेच लागू असलेली भारतीय रिझर्व्ह बँकेची परिपत्रके, निर्देश, मार्गदर्शक तत्त्वे, आवश्यकता किंवा कायद्याचे बळ असलेले कोणतेही शासकीय निर्बंध यांचा समावेश होतो; तसेच वरील बाबींपैकी कोणत्याही संदर्भात कोणत्याही न्यायिक प्राधिकरणाने केलेले निर्धारण किंवा अर्थनिर्वचन हेदेखील “कायदा” म्हणून समाविष्ट आहे. मग ते नोंदणीच्या दिनांकास अस्तित्वात असोत किंवा त्यानंतर लागू झालेले असोत, आणि वेळोवेळी त्यात करण्यात आलेल्या दुरुस्त्या किंवा बदलांसह.

"ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन" म्हणजे व्हर्च्युअल आणि/किंवा फिजिकल सेमी-क्लोज्ड प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट, ज्यावर लागू असलेली मासिक व्यवहार आणि बॅलन्स मर्यादा या आरबीआयने निर्धारित केलेल्या वॉलेट मर्यादेनुसार असतील, आणि जे ॲक्सिस बँकेद्वारे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमार्फत ऑफर केले जाते. ॲक्सिस बँकेने "भारतात प्री-पेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स जारी करणे आणि चालवणे" यावरील आरबीआय पॉलिसी मार्गदर्शक तत्त्वांचे अनुपालन करून पूर्वोक्त प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट ऑफर केले आहे.

"मोबाईल फोन नंबर" म्हणजे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या नोंदणी दरम्यान ग्राहकाद्वारे निर्दिष्ट केलेला फोन नंबर. जर ग्राहकाला "ॲक्सिस बँक ग्राहक" म्हणून नोंदणी करायची असेल तर त्याला/तिला ॲक्सिस बँकद्वारे ऑफर केलेल्या मोबाईल किंवा एसएमएस बँकिंग सुविधेसाठी नोंदणीकृत फोन नंबर वापरावा लागेल. इतर कोणताही फोन नंबर "नॉन-ॲक्सिस बँक ग्राहक" म्हणून मानला जाईल.

"मोबाईल फोन" म्हणजे वैध सिम कार्ड सक्षम स्मार्टफोन (iOS किंवा अँड्रॉईड ऑपरेटिंग सिस्टीमवर चालणारा) जो ग्राहकाच्या मालकीचा आहे.

"पैसे" म्हणजे खाते किंवा वॉलेट किंवा क्रेडिट कार्ड किंवा इतर कोणत्याही आर्थिक साधनांमध्ये ठेवलेली भारतीय रुपयांमधील (₹) रक्कम.

"वैयक्तिक माहिती" म्हणजे ग्राहकाने स्वैच्छिकपणे प्रदान केलेल्या आणि सेवांच्या संदर्भात ॲक्सिस बँकद्वारे ग्राहकाच्या संमतीसह प्राप्त केलेली कोणतीही माहिती.

"नोंदणीकृत ग्राहक" म्हणजे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनसाठी नोंदणीकृत ग्राहक.

"सेवा" म्हणजे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन अंतर्गत ॲक्सिस बँकद्वारे ऑफर केलेले सर्व उत्पादने आणि सेवा, जसे या अटींच्या कलम 4 मध्ये अधिक विशेषत: नमूद केले आहे.

"व्यवहार" म्हणजे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमधील सर्व ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारा केलेले व्यवहार.

"ग्राहक" म्हणजे ॲक्सिस बँकेचा पात्र खाते धारक तसेच अन्य कोणतीही व्यक्ती (जिला बँकेशी कोणतेही नाते असणे आवश्यक नाही) ज्याने ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन डाउनलोड केले आहे. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनअंतर्गत उपलब्ध सेवांचा लाभ घेण्यासाठी ॲक्सिस बँकेत नोंदणी केली आहे.

"वेबसाईट" म्हणजे ॲक्सिस बँकच्या मालकीची, स्थापित केलेल्या आणि देखभाल केलेल्या वेबसाईटचा समावेश असेल उदा: www.axisbank.com आणि www.axisbank.co.in किंवा ॲक्सिस बँकद्वारे वेळोवेळी होस्ट केलेल्या इतर कोणत्याही वेबसाईटचा समावेश असेल.

या अटींच्या हेतूंसाठी, जोपर्यंत विरुद्ध हेतू दिसून येत नाही तोपर्यंत:

a. ग्राहकाचा उल्लेख जिथे जिथे पुल्लिंगी स्वरूपात केला गेला आहे. तिथे तो स्त्रीलिंगी स्वरूपातही समाविष्ट आहे, असे समजले जाईल.

b. "दुरुस्ती" या शब्दाच्या कोणत्याही उल्लेखामध्ये पूरक जोडणी, बदल, नवीन करार, रिप्लेसमेंट किंवा पुन्हा अंमलबजावणी समाविष्ट आहे आणि "दुरुस्त केलेला" या शब्दाचा अर्थ त्यानुसार समजून घेतला जाईल;

c. अधिकृतता" किंवा "मंजुरी" मध्ये अधिकृतता, संमती, क्लिअरन्स, मंजुरी, परवानगी, ठराव, परवाना, सूट, फायलिंग आणि नोंदणी समाविष्ट आहे;

d. एकवचनीमध्ये अनेकवचनी समाविष्ट आहे (आणि त्याउलट);

योग्यता

I. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन अंतर्गत ऑफर केलेल्या सेवा भारतीय नागरिक असलेल्या आणि ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये नोंदणीच्या तारखेला 18 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ग्राहकांसाठी उपलब्ध असतील, तथापि, ही सेवा या अटींच्या अधीन असेल की तो/ती ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन डाउनलोड करतो, यशस्वीरित्या इंस्टॉल करतो आणि त्यानंतर लागू क्रेडेन्शियल्ससह स्वत:ला प्रमाणित करतो आणि त्याचा एम-पिन सेट करतो.

II. सेवांचा लाभ घेण्यासाठी, ग्राहकाला प्रथम आवश्यक क्रेडेन्शियल्ससह ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये नोंदणी करावी लागेल. त्यानंतर ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमध्येच दिलेल्या निर्देशानुसार पुढील प्रक्रिया ग्राहकाने पूर्ण करावी.

III. ही सेवा केवळ पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या ग्राहकालाच उपलब्ध करून दिली जाईल आणि ॲक्सिस बँकेच्या विवेकबुद्धीनुसार प्रदान केली जाईल आणि ग्राहकाला कोणत्याही पूर्वसूचनेसह किंवा त्याशिवाय ॲक्सिस बँकद्वारे कोणत्याही वेळी बंद केली जाऊ शकते.

IV. ग्राहक समजतो आणि स्वीकारतो की मोबाईल उपकरण, डाटा कनेक्शन इ. सह परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या सेवांची प्राप्ती करण्यासाठी पूर्व-आवश्यक असलेली इतर कोणतीही स्थिती ही ग्राहकाची एकमेव जबाबदारी असेल.

V. सेवांचा लाभ घेण्यासाठी ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनसाठी नोंदणी करुन ग्राहक या अटी तसेच लागू असलेल्या, विशिष्ट सेवांशी संबंधित काही अतिरिक्त सेवा अटी आणि शर्ती ("सेवा अटी") मान्य करतो आणि स्वीकारतो, ज्या ग्राहकाला वेळोवेळी सूचित केल्या जातील. तसेच, ग्राहकाचे सेवा घेणे पुढे चालू ठेवणे हे त्या सेवा अटींची त्याची/तिची बिनशर्त स्वीकृती मानली जाईल आणि त्या ग्राहकावर बंधनकारक असतील.

ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन

परतावा

सर्व रिफंड आणि रिव्हर्सल्स हे स्त्रोत खात्यात जमा केले जातील. जिथून कपात झाले त्या खात्यामध्ये. रिफंड, अयशस्वी / परत / नाकारलेले / रद्द केलेल्या व्यवहारांच्या बाबतीत, आरबीआयने विहित केलेल्या वॉलेट मर्यादेनुसार केले जातील. या मर्यादा वेळोवेळी बँकेच्या विवेकबुद्धीनुसार किंवा लागू कायद्यानुसार किंवा कोणत्याही नियामक बदलांनुसार बदलू शकतात.

रिचार्ज:

a. प्रीपेड मोबाईल रिचार्ज करण्यासाठी ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर केला जाऊ शकतो. ॲक्सिस कोणतीही मोबाईल सेवा प्रदान करत नाही आणि केवळ दूरसंचार सेवा प्रदाते किंवा अशा प्रीपेड रिचार्ज ('टेल्को' किंवा 'टेल्कोज') किंवा अशा टेल्कोच्या इतर वितरक किंवा ॲग्रीगेटर द्वारे प्रीपेड मोबाईल सेवांचा पुनर्विक्रेता आहे. ॲक्सिस हे टेल्कोद्वारे पुरवल्या जाणाऱ्या सेवांसाठी वॉरंटर, विमाकर्ता किंवा हमीदार नाही.

b. ॲक्सिसद्वारे केलेल्या रिचार्जवर प्रक्रिया होण्यास 3 ते 4 कामकाजाचे दिवस लागू शकतात. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ग्राहकाला विक्री केला गेलेला रिचार्ज हा, टेल्कोकडून करारभंग झाल्यास बँकेविरुद्ध कोणताही दावा करण्याचा हक्क ग्राहकास राहणार नाही, या अटीवर विकला जातो. खरेदी केलेल्या रिचार्जच्या गुणवत्तेसंदर्भात, प्रदान केलेल्या मिनिटांसंदर्भात, खर्च, कालबाह्यता किंवा इतर अटींसंबंधीचे कोणतेही वाद ग्राहकाने (किंवा रिचार्ज प्राप्तकर्त्याने) आणि टेलकोने थेट हाताळले पाहिजेत.

c. ॲक्सिस बँक आणि त्यांचे बिझनेस पार्टनर, रिचार्ज सेवांचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाकडून शुल्क आकारण्याचा आणि वसूल करण्याचा अधिकार राखून ठेवतात. ॲक्सिस बँक ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे सुरू केलेल्या रिचार्जसाठी कोणत्याही सेवा प्रदात्याद्वारे आकारले जाऊ शकणारे कोणतेही शुल्क वसूल करेल.

बिल पे

- "बिल पे" वैशिष्ट्ये ग्राहकाला मोबाईल, लँडलाईन, डीटीएच, डाटा कार्ड, वीज, गॅस आणि विमा सेवांशी संबंधित बिल भरण्याची परवानगी देतात.
- जर ग्राहकाने बिल भरण्यासाठी स्थायी सूचना दिली असेल तर सोर्स खाते/वॉलेटमध्ये पुरेशी शिल्लक असल्याची खात्री करणे ही ग्राहकाची जबाबदारी असेल तसेच ऑटो पेच्या बाबतीत निवडलेली तारीख देय तारखेच्या किमान 3 ते 4 कामकाजाचे दिवस आधी असल्याची खात्री करावी. बिलरद्वारे आकारलेले विलंबित देयक किंवा विलंबित देयक शुल्काच्या बाबतीत ॲक्सिस बँकेची कोणतीही जबाबदारी नाही.
- ॲक्सिस बँक आणि त्यांचे बिझनेस पार्टनर, बिल पेमेंट सेवांचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाकडून शुल्क आणि वसूल करण्याचा अधिकार राखून ठेवतात. ॲक्सिस बँक ही ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे सुरू केलेल्या बिल देयकासाठी कोणत्याही बिलरद्वारे आकारले जाऊ शकणारे कोणतेही शुल्क वसूल करेल.
- ॲक्सिस बँक बिझनेस पार्टनर आणि बिलर/र्स ज्यांच्याद्वारे ग्राहक सेवा प्राप्त करतो, त्यांच्यावर अवलंबून: (i) सेवेची विशिष्ट वैशिष्ट्ये भिन्न असू शकतात (ii) सेवेवर उपलब्ध बिलर्सची संख्या भिन्न असू शकते (iii) पेमेंट सूचना जारी करण्यासाठी वापरल्या जाऊ शकणाऱ्या पेमेंट खातेचा प्रकार आणि श्रेणी भिन्न असू शकतात आणि (iv) ज्या माध्यमांमधून/उपकरणावरून सेवेत प्रवेश करता येतो, ते भिन्न असू शकतात; आणि (v) सेवा प्राप्त करण्यासाठी शुल्क, फी किंवा सेवेचा कोणताही पैलू भिन्न असू शकतो.
  - ॲक्सिस बँक, स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार वेळोवेळी बिलरच्या अशा यादीमध्ये किंवा बिलरला पेमेंट करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पेमेंट खात्याचे प्रकार जोडू किंवा हटवू शकते.
  - जर ॲक्सिस बँक पुढीलपैकी कोणत्याही एक किंवा अधिक परिस्थितीमुळे देयक तारखेच्या कोणत्याही देयक निर्देशांना प्रभावी करू शकत नसल्यास बँक कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही आणि तिच्यावर कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही:
  - जर ग्राहकाने जारी केलेली देयक सूचना अपूर्ण, विलंबित चुकीची आणि अवैध असेल तर.
  - देयक निर्देशांमध्ये नमूद केल्यानुसार रक्कम भरण्यासाठी देयक खात्यात पुरेसे फंड/मर्यादा नसल्यास

- देयक खात्यामध्ये उपलब्ध निधी कोणत्याही भार किंवा शुल्काच्या अंतर्गत असल्यास.
- जर ग्राहकाच्या बँकने देयक सूचना मानण्यास नकार दिला किंवा विलंब केला तर
- प्राप्त झाल्यानंतर बिलरद्वारे देयकावर प्रक्रिया न केल्यास.
- ॲक्सिस बँकेच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थिती

जर कोणत्याही कारणास्तव बिल देयक यशस्वी झाले नसेल तर ग्राहकाला त्यानुसार अयशस्वी देयकाविषयी सूचित केले जाईल.

व्यवहारांवर मर्यादा:

ॲक्सिस बँक त्यांच्या विवेकबुद्धीनुसार, ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ग्राहकाला एका दिवसात करण्यास अनुमती असलेल्या व्यवहारांवर मर्यादा घालू शकते. तसेच नवीन मर्यादा लागू करू शकते किंवा सदर मर्यादांमध्ये बदल करू शकते. व्यवहारांमध्ये निधी हस्तांतरण, मोबाईल रिचार्ज आणि बिल देय समाविष्ट आहे. जर दैनंदिन व्यवहाराची मर्यादा संपली असेल, तर ग्राहकाला त्या दिवसाकरिता ॲक्सिस ॲप्लिकेशनद्वारे व्यवहार करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

ऑफर्स

- या प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केलेल्या सर्व ऑफर पूर्वसूचनेशिवाय बदलण्याच्या/ मागे घेण्याच्या अधीन आहेत
- सर्व ऑफर हस्तांतरण करण्यायोग्य नाहीत. विक्री किंवा पुनर्विक्रीसाठी नाहीत किंवा रोख रकमेसाठी रिडीम करण्यायोग्य नाहीत आणि त्यांचे आर्थिक मूल्य असू शकत नाही
- कोणत्याही दोन ऑफरचे एकत्रित संयोजन केले जाऊ शकत नाही
- येथील कोणत्याही सवलती केवळ निव्वळ रकमेवर वैध आहेत (टॅक्स किंवा इतर कोणतेही अतिरिक्त शुल्क वगळून)
- ॲक्सिस मोबाईलद्वारे खरेदी किंवा बुकिंगसाठी कोणतेही व्यवहार संबंधित विक्रेत्यांच्या अटी व शर्तींच्या अधीन आहेत. ऑफर प्राप्त करणे ही उपलब्धता आणि मर्चंटच्या निर्णयावर अवलंबून आहे

- प्रत्येक वैयक्तिक व्यापाऱ्याच्या नियम व अटी त्यांच्यासोबतच्या सर्व ग्राहक व्यवहारांना लागू होतील. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही उत्पादनाचा किंवा सेवेचा ऑफरमध्ये समावेश करणे, हे ॲक्सिस बँक कडून अशा उत्पादनाचे किंवा सेवेचे समर्थन किंवा शिफारस असल्याचे मानले जाणार नाही

एफएटीसीए- सीआरएस अटी व शर्ती

सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ने इन्कम टॅक्स नियम, 1962 चा भाग म्हणून नियम 114 एफ ते 114 एच 7 ऑगस्ट 2015 रोजी सूचित केले, ज्यानुसार नियमांना भारतीय वित्तीय संस्था जसे की बँकेला आमच्या सर्व खाते धारकाकडून अतिरिक्त वैयक्तिक, कर व लाभार्थी मालक माहिती आणि ठराविक प्रमाणपत्र आणि कागदपत्रांची आवश्यकता आहे. संबंधित प्रकरणांमध्ये, खातेमधून उचित विथहोल्डिंग किंवा त्यासंबंधी कोणत्याही प्रक्रियेची खात्री करण्याच्या उद्देशाने माहिती टॅक्स प्राधिकरण/ नियुक्त एजन्सी/ विथहोल्डिंग एजंटला कळवावी लागेल. तुम्ही दिलेल्या कोणत्याही माहितीमध्ये काही बदल असल्यास, कृपया आम्हाला त्वरित सूचित करण्याची खात्री करा, म्हणजेच 30 दिवसांच्या आत. जर तुम्हाला तुमच्या टॅक्स निवासाविषयी काही प्रश्न असतील तर कृपया तुमच्या टॅक्स सल्लागाराशी संपर्क साधा. जर तुम्ही यूएस नागरिक किंवा निवासी किंवा ग्रीन कार्ड होल्डर असाल तर कृपया परदेशातील माहिती रकान्यात तुमच्या यूएस टॅक्स आयडेंटिफिकेशन नंबरसह युनायटेड स्टेट्स समाविष्ट करा. तुम्ही ज्या देशातील टॅक्स रहिवासी असाल त्या देशाने असे आयडेंटिफायर जारी केल्यास टीआयएन किंवा कार्यात्मक समतुल्य पुरवठा करणे अनिवार्य आहे. जर अद्याप कोणताही टीआयएन उपलब्ध नसेल किंवा अद्याप जारी केलेला नसेल तर कृपया स्पष्टीकरण द्या आणि हे फॉर्मसह जोडा. मला याची जाणीव आहे की बँकेने मला कोणतीही पूर्वसूचना न देता ठरवल्याप्रमाणे कोणतेही विद्यमान ग्राहक आयडी एकत्रित करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे, मी याद्वारे गंभीरपणे घोषित करतो की वर दिलेली माहिती अद्ययावत आणि बरोबर आहे आणि मी याद्वारे माझे अलीकडील छायाचित्र आणि केवायसी कागदपत्रांची छायाचित्रे सादर करत आहे.

वॉलेट खाते निष्क्रियता आणि बंद करणे

जर वॉलेट खात्यात दहा वर्षांच्या कालावधीत कोणतेही व्यवहार झाले नाहीत. तर खाते निष्क्रिय खाते म्हणून मानले जाईल. त्यामुळे ग्राहकाने नियमितपणे खात्यावर व्यवहार केले पाहिजे. जेणेकरून ते निष्क्रिय होणार नाही. खात्यात सलग दहा वर्षांच्या कालावधीपर्यंत, ग्राहकाने स्वतः केलेले कोणतेही डेबिट, क्रेडिट आणि/किंवा तृतीय-पक्ष व्यवहार नसतील, तर ते खाते 'निष्क्रिय' म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकते. बँकेद्वारे सुरू केलेला कोणताही व्यवहार ग्राहक प्रेरित व्यवहार म्हणून विचारात घेतला जाणार नाही. ग्राहकाला सूचित करण्याच्या कोणत्याही बंधनाशिवाय निष्क्रिय वॉलेट खाते बंद करण्याचा अधिकार बँकेकडे राखीव आहे. ग्राहकाने प्रेरित केलेल्या शेवटच्या व्यवहाराच्या तारखेपासून 10 वर्षे पूर्ण झाल्यानंतर न वापरलेल्या फंडसह वॉलेट खाते डीईएएफ (ठेवीदार जागरूकता आणि शिक्षण फंड) मध्ये वर्ग केले जाईल.

जर वॉलेटमधील बॅलन्स शून्य असेल तर, ग्राहकाला सूचित करण्याच्या कोणत्याही बंधनाशिवाय खाते कोणत्याही वेळी बंद करण्याचा अधिकार ॲक्सिस बँकेला आहे.

ॲक्सिस बँककडे सेवा प्रदाता बदलण्याचा किंवा ॲक्सिस ज्या पद्धतीने प्रदान सेवा प्रदान करते ती पद्धत बदलण्याचा अधिकार राखीव आहे. ॲक्सिस बँककडे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन बंद करण्याचा आणि बॅलन्स त्यांच्या ॲक्सिस सेव्हिंग्स खात्यामध्ये हलवण्याचा अधिकार राखीव आहे.

ॲक्सिस बँकेने सेवा प्रदाता बदलल्याच्या तारखेपासून 60 दिवस पूर्ण झाल्यानंतर नवीन सेवा प्रदात्याकडील दावा न केलेले फंड डीईएएफ (ठेवीदार जागरूकता आणि शिक्षण फंड) मध्ये वर्ग करण्याचा अधिकार ॲक्सिस बँकेकडे आहे.

दुरुस्ती करण्याचा अधिकार

ॲक्सिस बँक स्पष्टपणे, कोणत्याही वेळी आणि ग्राहकांना पूर्वसूचना न देता, या कार्यक्रमाशी संबंधित अटींमध्ये भर घालण्याचा आणि/किंवा बदलण्याचा, सुधारण्याचा किंवा सर्व किंवा अंशतः बदल करण्याचा अधिकार राखून ठेवते.

कर

सरकार किंवा इतर कोणत्याही वैधानिक प्राधिकरण/संस्थेला किंवा कोणत्याही सहभागी आस्थापनेला देय असलेले कोणतेही कर किंवा इतर दायित्वे किंवा शुल्क, जे कार्यक्रमाच्या तरतुदीमुळे ग्राहकांवर आकारले जाऊ शकतात किंवा जमा होऊ शकतात, ते ग्राहकाचीच एकमेव जबाबदारी असतील.

अधिकारक्षेत्र

या कार्यक्रमामुळे किंवा त्याच्याशी संबंधित किंवा परिणामी किंवा अन्यथा विवाद, जर काही असेल तर, उद्भवले तर ते भारतीय कायद्यांच्या अधीन असतील आणि केवळ मुंबईतील सक्षम न्यायालये/न्यायाधिकरणांच्या विशेष अधिकारक्षेत्रात असतील.

ॲक्सिस बँकेचे अधिकार

ग्राहक, ॲक्सिस बँक ॲप्लिकेशन अंतर्गत त्यांनी घेतलेल्या सेवांशी संबंधित सर्व व्यवहारांसाठी (वरीलप्रमाणे परिभाषित केलेले) आणि बँकिंग व्यवहारांसाठी सूचना प्रभावीपणे कार्यान्वित करण्याकरिता, ॲक्सिस बँकेला त्यांचे खाते ॲक्सेस करण्याची अपरिवर्तनीय आणि बिनशर्त परवानगी देतो. तसेच, ग्राहकाच्या अशा विनंत्या स्वीकारण्यासाठी/कार्यवाही करण्यासाठी ॲक्सिस बँकेला खात्याची माहिती कोणत्याही तृतीय पक्षांसोबत सामायिक करण्याचीही परवानगी देतो.

अधिकृतता

- ग्राहक ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन अंतर्गत त्यांनी घेतलेल्या सेवांच्या संदर्भात सर्व व्यवहार (वर परिभाषित केल्याप्रमाणे) आणि बँकिंग व्यवहारांसाठी सूचना लागू करण्यासाठी त्याचे खाते संचलित करण्यासाठी अपरिवर्तनीयपणे आणि बिनशर्तपणे ॲक्सिस बँकेला अधिकृत करतो.
- ग्राहक अपरिवर्तनीयपणे आणि बिनशर्तपणे ॲक्सिस बँकेला त्यांचे खाते आणि सेवांद्वारे ग्राहकाच्या बँकिंग किंवा इतर व्यवहारांवर परिणाम करण्यासह सेवा प्राप्त करण्यासाठी ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या

प्रमाणीकरणाच्या वेळी नोंदणीकृत वैयक्तिक तपशील ॲक्सेस करण्यास अधिकृत करतो.

- ॲक्सिस बँक ॲप्लिकेशन अंतर्गत ग्राहकाला पुरवण्यात येणाऱ्या सेवा देण्यासाठी सेवा पुरवठादार किंवा अन्य कोणत्याही तृतीय पक्षाला आवश्यक असलेली आणि लागू कायद्यांनुसार आवश्यक असलेली ग्राहकाची सर्व व्यक्तिगत माहिती त्यांना उघड करण्याची परवानगी ग्राहक स्पष्टपणे ॲक्सिस बँकेला देतो.
- ग्राहकाचे तपशील आणि व्यवहार तपशील रेकॉर्ड करण्याचा अधिकार याद्वारे ग्राहकाने ॲक्सिस बँकेला स्पष्टपणे मंजूर केला आहे. ॲक्सिस बँकेच्या सर्व नोंदी ज्या सेवांच्या वापरातून निर्माण झालेल्या व्यवहारांतून निर्मित आहेत. ज्यामध्ये त्यामध्ये व्यवहाराची वेळ, लाभार्थी तपशील इ. बाबींचा समावेश होतो; नोंदी या व्यवहारांच्या सत्यतेचा आणि अचूकतेचा निर्णायक पुरावा असेल.
- ॲक्सिस बँकेला ग्राहकाच्या मोबाईल फोन नंबरवर कोणतेही संदेश पाठवण्याची किंवा कॉल करण्याची, किंवा ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनवर बॅनर किंवा इतर कोणतेही संप्रेषण प्रदर्शित करण्याची परवानगी ग्राहक देतो. ही परवानगी, सध्या उपलब्ध असलेल्या किंवा भविष्यात ॲक्सिस बँक आणू शकणाऱ्या बँकेच्या नवीन उत्पादनांसह कोणत्याही जाहिरातपर ऑफर्सची माहिती, शुभेच्छा, बॅनर किंवा इतर कोणतेही जाहिरातपर संदेश किंवा ॲक्सिस बँकेला ग्राहकासाठी योग्य वाटेल असा कोणताही अन्य संदेश देण्यासाठी आहे.
- ग्राहक अपरिवर्तनीय आणि बिनशर्त सहमती देतो की ॲक्सिस बँक आणि/किंवा तिचे प्रतिनिधी यांनी केलेले असे कॉल किंवा संदेश हे ग्राहकाच्या गोपनीयतेचे उल्लंघन म्हणून समजले जाणार नाहीत आणि त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.
- ग्राहकाने पाठवलेली विनंती ॲक्सिस बँकेने सेवा उपलब्ध करून देण्यासाठी निश्चित केलेल्या आवश्यकतांनुसार नसल्यास, ॲक्सिस बँकेला कोणताही नकाराचा संदेश पाठवण्याची किंवा कोणताही व्यवहार/विनंती नाकारण्याची परवानगी ग्राहक देतो.

- ग्राहकांची वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवल्याची खात्री करण्यासाठी ॲक्सिस बँक सर्व वाजवी प्रयत्न करेल. परंतु, ग्राहकाच्या बाजूने त्यांच्या गोपनीय माहितीचे कोणतेही प्रकटीकरण किंवा माहिती उघड झाल्यास, त्याची जबाबदारी ॲक्सिस बँकेची नसेल.
- ग्राहक ॲक्सिस बँकेस स्पष्टपणे अधिकृत करतो की, ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनवरील सोशल कनेक्टच्या वापराद्वारे ग्राहकासाठी उपलब्ध असलेल्या आणि/किंवा ग्राहकाच्या विनंतीनुसार केलेल्या सर्व विनंत्या किंवा व्यवहार ॲक्सिस बँकेने पूर्ण करावेत. यासाठी, ॲक्सिस बँकेस ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ग्राहकाकडून प्राप्त झाल्याचे भासणाऱ्या कोणत्याही विनंतीची किंवा व्यवहाराची सत्यता पडताळण्याची आवश्यकता राहणार नाही.
- ॲक्सिस बँकेकडे भविष्यात कोणत्याही वेळी या सेवांद्वारे कोणत्याही नवीन सेवा सुरू करण्याचा पर्याय असेल आणि ग्राहकाने अशा नवीन सेवांसाठी ग्राहकाची नोंदणी करण्यासाठी ॲक्सिस बँकेला स्पष्टपणे अधिकृत केले आहे असे मानले जाईल.

ग्राहकाचे दायित्व आणि जबाबदाऱ्या

1. सेवांचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाने प्रदान केलेल्या कोणत्याही माहितीच्या अचूकतेसाठी ग्राहक जबाबदार असेल.
2. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे केलेल्या रिचार्ज, बिल पेमेंट आणि इतर कोणत्याही सेवांसाठी ग्राहक पूर्णपणे जबाबदार असेल.
3. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनअंतर्गत सेवा घेणारा ग्राहक, भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या 'नो युवर कस्टमर' (केवायसी) / 'अँटी-मनी लॉंडरिंग' (एएमएल) / 'कॉम्बॅटिंग फायनान्सिंग ऑफ टेररिझम' संबंधी लागू मार्गदर्शक तत्त्वांच्या तसेच 'मनी लॉंडरिंग प्रतिबंधक अधिनियम' (पीएमएलए) आणि त्याअंतर्गत वेळोवेळी करण्यात आलेल्या नियम व दुरुस्ती यांच्या अधीन राहून बांधील असेल.
4. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ऑफर केलेल्या सेवांचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाने प्रदान केलेल्या माहितीमध्ये कोणतीही विसंगती आढळल्यास तो उत्तरदायी आणि जबाबदार असेल.

5. ग्राहकाला ॲक्सिस बँकेने प्रदान केलेल्या माहितीत कोणतीही त्रुटी असल्याचा संशय आल्यास, त्याने त्वरित बँकेस सूचित करणे आवश्यक आहे. ॲक्सिस बँक सर्वोत्तम प्रयत्नाच्या आधारावर शक्य तिथे त्वरित त्रुटी दुरुस्त करण्याचा प्रयत्न करेल.

6. बँकद्वारे कोणत्याही सेवा प्रदात्याला किंवा तृतीय पक्षाला वैयक्तिक माहिती उघड केल्यामुळे ग्राहकाला झालेल्या कोणत्याही नुकसानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही, ज्यामध्ये कोणत्याही दूरसंचार किंवा इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग नेटवर्कमध्ये सहभाग, सांख्यिकीय विश्लेषणासाठी किंवा क्रेडिट रेटिंगसाठी किंवा कोणत्याही कायदेशीर किंवा नियामक अनुपालनासाठी कोणत्याही कायदेशीर किंवा नियामक निर्देशांचे पालन करणे समाविष्ट आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही.

7. सदर सेवांच्या वापरासाठी ग्राहक त्याच्या मोबाईल फोन आणि एम-पिनचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असेल.

8. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनवर प्रदान केलेल्या वर नमूद केलेल्या कोणत्याही एम-पिन किंवा क्रेडेन्शियल्सचा कोणत्याही प्रकारचा अनधिकृत किंवा बेकायदेशीर वापर, किंवा ग्राहकाने दिलेल्या कोणत्याही फसव्या किंवा चुकीच्या सूचनेमुळे उद्‌भवलेल्या कोणत्याही आर्थिक शुल्कासाठी ग्राहक बँकेकडे जबाबदार राहील, आणि सदर शुल्क केवळ ग्राहकाकडूनच देय असेल.

9. ग्राहक मान्य करतो की संबंधित सेवांसाठी ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवरून वैध एम-पिनद्वारे केला गेलेला कोणताही व्यवहार हा ग्राहकानेच स्वतःच्या इच्छेनुसार प्रारंभ केलेला आहे असे मानले जाईल.

10. ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरमध्ये बदल झाल्यास किंवा त्याचा मोबाईल हरवल्यास किंवा इतर कोणास प्रदान करण्यात आल्यास, संबंधित सेवांचे निलंबन करण्यासाठी बँकेकडे विनंती करणे ही पूर्णपणे ग्राहकाची स्वतःची जबाबदारी असेल. ग्राहकाला त्याच्या खातेमध्ये झालेल्या कोणत्याही अनधिकृत व्यवहाराची माहिती मिळाल्यास, त्याने तत्काळ बँकेस सूचित करणे आवश्यक असेल.

11. ॲक्सिस बँक काही अन्य अतिरिक्त सेवा पुरवण्याचा निर्णय घेऊ शकते, त्या अनुषंगाने, सेवांशी संबंधित कोणत्याही माहितीसह स्वतःला अपडेट ठेवण्याची जबाबदारी ग्राहकाची राहील. ग्राहकाकडून झालेल्या कोणत्याही दुर्लक्षासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

12. जर ग्राहकाने येथे नमूद केलेल्या नियम व सेवा अटी तसेच इतर लागू नियम व अटींचे उल्लंघन केले असेल, किंवा स्वतःच्या निष्काळजीपणामुळे तोटा घडवून आणला किंवा

त्यात योगदान दिले असेल, अथवा ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये त्याच्या वतीने झालेल्या कोणत्याही अनधिकृत प्रवेशाबाबत वाजवी कालावधीत ॲक्सिस बँकेस सूचित करण्यात तो अपयशी ठरला असेल, तर अशा सर्व प्रकारच्या नुकसानीसाठी ग्राहक पूर्णपणे उत्तरदायी राहील.

13. ग्राहक या सेवांचा वापर करून, वरील सर्व नियम व अटींना सहमत आहे असे मानले जाईल, आणि हे नियम व अटी ग्राहकास, त्याने बँकेला लेखी स्वरूपात सहमती दर्शविली आहे अशाप्रकारेच बंधनकारक राहतील.

सेवेच्या इतर अटी

या अटी व शर्ती कोणत्याही खातेच्या सर्वसाधारण अटी व शर्तींना आणि ॲक्सिस बँक आपल्या ग्राहकांना पुरवत असलेल्या इतर कोणत्याही सेवांना पूरक आहेत:

1. या सेवा भारतीय नागरिक असलेल्या आणि ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये नोंदणीच्या तारखेला 18 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध असेल.

2. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनवरील सेवा प्राप्त करण्यासाठी आणि वापरण्यासाठी, ग्राहकाने ॲक्सिस बँकेने निश्चित केलेल्या आणि उपलब्ध करून दिलेल्या विशिष्ट प्रक्रियांद्वारे आणि माध्यमांद्वारे, स्वतःची नोंदणी करणे अनिवार्य असेल.

3. ॲक्सिस बँककडे ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन अंतर्गत ऑफर केलेल्या सेवांसाठी ग्राहकाला शुल्क आकारण्याचा अधिकार राखीव आहे.

4. ॲक्सिस बँकद्वारे या सेवा ग्राहकाच्या विनंतीनुसार आणि ग्राहकाकडून मिळालेल्या सूचनांवर आधारित प्रदान केल्या जातील.

5. ग्राहक या सेवांचा लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत असलेल्या बँकेतील त्याच्या खाते (अकाउंट्स) मधून रक्कम डेबिट करण्यासाठी ॲक्सिस बँकेला अपरिवर्तनीयपणे आणि बिनशर्त अधिकृत करतो.

6. ग्राहक सहमत आहे आणि पुष्टी करतो की, सदर सेवांचा लाभ घेण्यासाठी:

a. ग्राहकाने प्रदान केलेले कोणतेही तपशील ॲक्सिस बँक सर्व्हर डाटाबेसवर स्टोअर केले जातील.

b. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनअंतर्गत असलेल्या सर्व सेवांसाठी ॲक्सिस बँकेने निश्चित केलेल्या मर्यादेचे ग्राहकाने पालन करावे.

7. या सेवांचा लाभ घेण्याच्या उद्देशाने, ग्राहक सेवांद्वारे ऑफर केलेल्या ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन आणि सेवांचा अनधिकृत आणि बेकायदेशीर वापर टाळण्यासाठी सर्व आवश्यक सावधगिरी घेईल.

8. एम-पिन/ओटीपी/कोड/पासवर्डची गोपनीयता राखण्यासाठी आणि अशा एम-पिन/ओटीपी/पासकोड/पासवर्डचा वापर किंवा गैरवापर यामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिणामांसाठी ग्राहक जबाबदार असेल.

9. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करून ग्राहकाच्या विनंतीनुसार लाभार्थ्यांना हस्तांतरित केलेल्या कोणत्याही आणि सर्व निधीसाठी, किंवा ग्राहकाला प्राप्त झालेल्या निधीसाठी ग्राहक स्वतः जबाबदार राहील.

10. ग्राहकाच्या निष्काळजी कृतींमुळे किंवा ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये त्याच्या वतीने झालेल्या कोणत्याही अनधिकृत वापर/प्रवेशाबाबत, किंवा एमपिन/ओटीपी/पासकोड/पासवर्डच्या गैरवापराबद्दल, अथवा सेवेसंबंधी सुरक्षेच्या इतर कोणत्याही उल्लंघनाबद्दल ज्याची त्याला माहिती आहे, अशा बाबींची वाजवी वेळेत ॲक्सिस बँकेला तात्काळ सूचना देण्यात तो अपयशी ठरल्यास, त्यामुळे झालेल्या संपूर्ण नुकसानीसाठी ग्राहक जबाबदार राहील.

11. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करताना, ग्राहकाने अशी कोणतीही सामग्री अपलोड, डाउनलोड, पोस्ट करू नये किंवा अन्यथा प्रसारित करू नये जी बेकायदेशीर, हानिकारक, धमकी देणारी, अपमानास्पद, अश्लील, त्रासदायक, बदनामीकारक, बीभत्स, कामुक, अपवित्र, असभ्य, भडकवणारी, मानहानिकारक, अन्यायकारक, द्वेषपूर्ण, जातीय, वांशिक, सामाजिक, राजकीय, कायदेशीर, नैतिक, धार्मिक दृष्ट्या आक्षेपार्ह असेल किंवा अन्यथा आक्षेपार्ह असेल, किंवा ज्यामुळे इतरांच्या अधिकारांवर होईल, ज्यामध्ये प्रसिद्ध व्यक्तीचे अधिकार, गोपनीयतेचा आणि बौद्धिक संपदेच्या अधिकारांचा समावेश आहे पण त्यांपुरतीच ती मर्यादित नाही.

12. ग्राहक अपरिवर्तनीयपणे आणि बिनशर्तपणे ॲक्सिस बँकेला, सेवांअंतर्गत त्याने अंमलात आणलेल्या व्यवहारांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती ॲक्सेस करण्यास आणि अशा विनंत्या स्वीकारण्याच्या/अंमलात आणण्याच्या उद्देशाने कोणत्याही तृतीय पक्षासोबत त्याची आवश्यक माहिती शेअर करण्यास अधिकृत करतो.

13. ॲक्सिस बँक तिच्या इच्छेनुसार कोणत्याही स्वरूपात व्यवहारांचे रेकॉर्ड ठेवू शकते. कोणत्याही विवादाच्या बाबतीत, बँकेचे रेकॉर्ड हे नमूद ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे केलेल्या व्यवहाराचे निर्णायक पुरावे मानले जातील आणि ग्राहकावर बंधनकारक असतील.

14. ग्राहकाने, ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन आणि/किंवा त्याद्वारे प्रदान केलेल्या सेवांचा वापर/ॲक्सेस ॲक्सिस बँकेने अधिकृत केलेल्या पद्धतीशिवाय इतर कोणत्याही प्रकारे करू नये. जर ग्राहकाने ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर बेकायदेशीर, अयोग्य किंवा या अटी/इतर निर्दिष्ट अटी व शर्तींनुसार अधिकृत नसलेल्या कोणत्याही हेतूसाठी केला, तर ॲक्सिस बँकेला सर्व वाजवी उपाययोजना करण्याचा अधिकार आहे.

15. ग्राहक पुष्टी करतो की, अशा सेवांचा लाभ घेण्यासाठी त्याने वापरलेल्या अधिकृत एम-पिन/ओटीपी/पासकोड/पासवर्डच्या प्रमाणीकरणानंतरच त्याच्याद्वारे दिलेल्या कोणत्याही सूचना लागू केल्या जातील.

16. ग्राहक सहमत आहे आणि पुष्टी करतो की, एकदा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर, त्याने दिलेल्या कोणत्याही स्टॉप-पेमेंट सूचना ॲक्सिस बँकेद्वारे स्वीकारल्या जाऊ शकत नाहीत आणि त्यावर कारवाई केली जाऊ शकत नाही.

17. ग्राहक सेवांचा वापरताना हे सुनिश्चित करेल की:

a. तिला/त्याला मिळालेल्या सेवा ॲक्सेस करण्याचा आणि त्याचा लाभ घेण्याचा अधिकार आहे आणि ते भारतामध्ये प्रचलित असलेल्या लागू कायदे आणि नियमांचे रीतसर पालन करतील.

b. ती/तो ॲक्सिस बँकेला सेवेच्या कामगिरीसाठी आणि/किंवा या सेवांच्या अंतर्गत ॲक्सिस बँकेच्या इतर कोणत्याही दायित्वांसाठी ॲक्सिस बँकेला आवश्यक असलेली माहिती आणि/किंवा सहाय्य प्रदान करेल.

c. अशा सेवांचा लाभ घेण्यासाठी ॲक्सिस बँकेला अचूक आणि अस्सल माहिती/सूचना देण्यासाठी ती/तो जबाबदार असेल.

d. ती/तो ॲक्सिस बँक किंवा इतर कोणत्याही बँकेत असलेल्या खातेचा तपशील ज्यात वेळोवेळी मिळालेले पासवर्ड, खाते नंबर समाविष्ट आहेत ते कोणत्याही व्यक्तीला प्रदान करणार नाही.

18. ग्राहक मान्य करतो की, ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन अंतर्गत ॲक्सिस बँकद्वारे ऑफर केलेल्या सेवा त्यांच्या स्वत:च्या जोखमीवर प्राप्त केल्या जातील आणि या जोखमींमध्ये खालील जोखीमांचा समावेश असेल:

a. कोणतीही तांत्रिक त्रुटी, बिघाड, चूक, नेटवर्क बिघाड, कायदेशीर प्रतिबंध आणि इतर कारणे जी ॲक्सिस बँकेच्या नियंत्रणाबाहेर आहेत, त्यासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

b. ग्राहकाने प्रदान केलेली माहिती चुकीची/अयोग्य असल्यामुळे/अचूक नसल्यामुळे ग्राहकाला होणारा कोणतीही तोटा, नुकसान इत्यादीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

c. या प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही सेवा प्रदात्याकडून /इतर तृतीय पक्षाकडून /संस्थेकडून सेवांच्या पूर्ततेमुळे उद्‌भवणारे कोणतेही धोके; तसेच, सेवांमध्ये काही त्रुटी, दोष, अपयश किंवा खंड पडल्यामुळे, अथवा निधी हस्तांतरण विलंबाने झाल्यामुळे उद्‌भवलेल्या परिणामामुळे ग्राहकाला झालेले किंवा सोसावे लागलेले कोणतेही नुकसान किंवा क्षती.

d. प्रसारण वितरणामध्ये उशीर झाल्यामुळे किंवा ऑनलाईन/इलेक्ट्रॉनिक सूचनांचे वितरण न केल्यामुळे किंवा कोणतीही चूक, वगळणे किंवा त्याचे प्रसारण किंवा वितरण किंवा कोणत्याही कारणास्तव सूचनांना डिक्रिप्ट करण्यात किंवा त्याच्या प्राप्त झालेल्या चुकीच्या अर्थाने झालेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा ॲक्सिस बँकेच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही कृतीमुळे उद्‌भवणारे नुकसान किंवा हानी.

e. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन अंतर्गत ॲक्सिस बँकद्वारे ऑफर केलेल्या सेवांना सक्षम करणारे तंत्रज्ञान व्हायरस किंवा इतर दुर्भावनापूर्ण, विघातक किंवा दूषित कोड, प्रोग्राम किंवा मॅक्रोद्वारे प्रभावित होऊ शकते. सदर ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन/ॲक्सिस बँकेच्या सर्व्हरला देखभाल दुरुस्तीची आवश्यकता भासू शकते, आणि अशा वेळेत ग्राहकांच्या विनंत्या/व्यवहार यावर प्रक्रिया करणे अशक्य होऊ शकते. याचा परिणाम सूचनांच्या प्रक्रियेत विलंब किंवा सूचनांवरील प्रक्रिया अयशस्वी होणे आणि असे इतर अपयश आणि अक्षमता यात होऊ शकतो. ग्राहक मान्य करतो की, ॲक्सिस बँक कोणत्याही कारणास्तव ग्राहकाच्या सूचनेचे पालन करण्यात अपयश झाल्यास किंवा असमर्थ ठरल्यास, त्यातून उद्‌भवणाऱ्या थेट किंवा अप्रत्यक्ष नुकसानासाठी किंवा इतर कोणत्याही परिणामासाठी बँकेवर कोणतीही जबाबदारी लागू होणार नाही.

f. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ॲक्सिस बँकद्वारे ऑफर केलेल्या सेवांविषयी त्याच्या/तिच्या माहितीमुळे ग्राहकाला झालेल्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार धरली जाणार नाही.

19. ग्राहक सहमत आहे की ॲक्सिस बँक या संदर्भात कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही:

a. ग्राहकाच्या सूचनांवर आधारित विश्वासपूर्वक सेवा अंतर्गत केलेले व्यवहार.

b. जेव्हा ॲक्सिस बँकेकडे सूचना खऱ्या नाहीत किंवा अन्यथा अस्पष्ट, अयोग्य, संदिग्ध किंवा संशयास्पद आहेत असा विश्वास वाटण्याचे कारण असेल तेव्हा व्यवहार न करणे.

c. सेवेतील कोणत्याही त्रुटी, दोष, अपयश किंवा अडथळ्यामुळे किंवा विलंबित हस्तांतरण/रक्कम पाठवण्यामुळे उद्भवलेल्या परिणामांमुळे किंवा ॲक्सिस बँकेच्या नियंत्रणाबाह्य कोणत्याही कारणास्तव ग्राहकाला होणाऱ्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

d. ग्राहक मान्य करतो आणि सहमत आहे की ॲक्सिस बँक या सेवेसाठी केवळ सुविधाकर्ता आहे आणि ॲक्सिस बँक या सेवांसाठी कोणतीही जबाबदारी हमी देत नाही किंवा दावा करत नाही किंवा ॲक्सिस बँक अशा कोणत्याही सेवा आणि/किंवा त्याच्या स्थायी किंवा प्रतिष्ठेचे समर्थन करत नाही तसेच कोणत्याही प्रकारच्या अपूर्ण किंवा निकृष्ट सेवांसाठी आणि ग्राहकाला उद्भवणाऱ्या कोणत्याही तोटा/हानीसाठी ॲक्सिस बँक उत्तरदायी राहणार नाही. याबाबतचा सर्व जोखमीचा भार ग्राहकावरच असेल.

e. ग्राहकाने दिलेल्या माहिती/सूचना तृतीय पक्षाद्वारे वापरण्यामुळे तृतीय पक्षाकडून होणारा अनधिकृत प्रवेश.

f. या सेवांचा लाभ घेताना ग्राहकाला झालेल्या कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा परिणामी नुकसानीसाठी, सेवांमधील कोणत्याही त्रुटीमुळे उद्भवणारे आणि जे ॲक्सिस बँकच्या नियंत्रणाबाहेर आहेत.

g. जेव्हा ॲक्सिस बँकेने सद्भावनेने काम केले.

h. गोपनीय स्वरुपाच्या सर्व माहितीच्या प्रकटीकरणामुळे ग्राहकाला झालेले कोणतेही नुकसान, हानी, दायित्व

20. ग्राहक सहमत आहे की ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन अंतर्गत ॲक्सिस बँकेद्वारे ऑफर केलेल्या सेवांसाठी कोणतेही शुल्क ॲक्सिस बँकेच्या विवेकबुद्धीनुसार असेल आणि ॲक्सिस बँक ग्राहकाला कोणतीही सूचना न देता वेळोवेळी ते काढून घेणे/सुधारित करणे/बदलण्याचे स्वातंत्र्य आहे.

21. ग्राहक मान्य करतो की, कोणत्याही कारणास्तव सेवांचा वापर केल्यामुळे त्याचे बँक खाते बंद किंवा ब्लॉक झाल्यास, तो यासंबंधीची सर्व कामगिरी थेट आपल्या बँकेशी करेल आणि ॲक्सिस बँकेला यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार धरले जाणार नाही.

22. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे केलेल्या कोणत्याही आणि सर्व व्यवहारांसाठी ग्राहकच जबाबदार राहील. ॲक्सिस बँक कधीही किंवा ग्राहकाने अटींचा भंग केल्यास, पूर्वसूचना न देता कोणत्याही किंवा सर्व सेवा परत घेऊ किंवा समाप्त करू शकते; अथवा जर ॲक्सिस बँकेला ग्राहकाचा मृत्यू, दिवाळखोरी किंवा कायदेशीर क्षमतेचा अभाव माहित झाल्यास, किंवा इतर कोणत्याही कारणामुळे बँक सेवा समाप्त करू शकते.

23. ग्राहक या गोष्टीस सहमत आहे की, सदर ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन वापरून पेमेंट करण्यासाठी, त्याला/तिला बँकेमध्ये/बँकांमध्ये असलेल्या त्याच्या/तिच्या विविध बँक खातेमधील उपलब्ध रकमेचे एकत्रीकरण करण्याचा अधिकार नाही.

24. ग्राहक ॲक्सिस बँक आणि त्यांचे संचालक, अधिकारी, मालक, एजंट, को-ब्रँडर किंवा इतर भागीदार, कर्मचारी, माहिती प्रदाते, परवाना देणारे/घेणारे, सल्लागार, कंत्राटदार आणि अन्य संबंधित तृतीय पक्ष (एकत्रितपणे "नुकसानभरपाई पार्टी") यांना कोणत्याही दावे, मागण्या, कारवाईची कारणे, देणी किंवा दायित्व (यामध्ये वाजवी वकील शुल्क आणि इतर खर्चांचा समावेश आहे) यांपासून तो/ती नुकसानभरपाई देईल, त्यांचे संरक्षण करेल आणि त्यांना कोणत्याही प्रकारच्या हानीपासून मुक्त ठेवेल, जे उद्‌भवतात, संबंधित असतात किंवा उद्‌भवण्याची शक्यता असते :

a. या सेवेच्या अटी किंवा ॲक्सिस बँकेच्या इतर कोणत्याही अतिरिक्त अटी व शर्ती आणि धोरणांचे ग्राहकाद्वारे कोणतेही उल्लंघन किंवा अनुपालन न करणे;

b. ग्राहकाच्या कृती किंवा दुर्लक्षामुळे उद्‌भवलेला कोणताही वाद किंवा खटला;

c. कोणताही निष्काळजीपणा किंवा उल्लंघन किंवा तृतीय पक्षाद्वारे कोणत्याही कायद्याचे किंवा अधिकारांचे कथित उल्लंघन

25. ॲक्सिस बँक या ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे, प्रत्यक्ष किंवा त्यांच्या सहयोगी किंवा करार केलेल्या सेवा प्रदात्यांद्वारे कोणतीही सेवा प्रदान करू शकते.

26. प्रचलित एनपीसीआय मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कोणताही यूपीआय आयडी 365 दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीपर्यंत निष्क्रिय राहिल्यास, कोणतीही पुढील सूचना न देता तो निष्क्रिय केला जाऊ शकतो.

पेमेंट निर्देश थांबविणे

ग्राहकाने व्यवहारास मान्यता देऊन व्यवहारास प्रारंभ केल्यावर व्यवहार अंतिम, अपरिवर्तनीय आणि रद्द न करता येणारा मानला जाईल. अशा व्यवहारांसाठी पेमेंट थांबविणे, माघारी किंवा बदल करण्याबाबत कोणतीही विनंती बँक कोणत्याही परिस्थितीत स्वीकारणार नाही. व्यवहार अधिकृत करण्यापूर्वी लाभार्थ्यांचे खाते क्रमांक यासह सर्व व्यवहार तपशीलांची अचूकता आणि पूर्णता तपासणे ही ग्राहकाची संपूर्ण जबाबदारी आहे. ग्राहकाने दिलेल्या माहितीतील त्रुटी किंवा अचूकतेच्या अभावी उद्‌भवणाऱ्या कोणत्याही नुकसान, हानी किंवा परिणामांसाठी बँक बांधील असणार नाही.

गोपनीयता आणि प्रकटीकरण

लागू कायद्याद्वारे प्रतिबंधित नसल्यास, ॲक्सिस बँक ग्राहकाशी संबंधित कोणतीही वैयक्तिक माहिती आणि/किंवा ग्राहकाने सेवा वापरण्यासाठी दिलेली कोणतीही इतर माहिती आपल्या शाखा, प्रतिनिधी कार्यालये, सहयोगी संस्था, प्रतिनिधी, लेखा परीक्षक आणि ॲक्सिस बँकेने निवडलेल्या तृतीय पक्षांना (त्यांच्या स्थानाची पर्वा न करता) ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या गोपनीय वापरासाठी आणि त्याच्या संदर्भात उघड करण्यास, सामायिक करण्यास किंवा हस्तांतरित करण्यास हक्कदार असेल. तसेच, ॲक्सिस बँकेस कोणत्याही वेळी, ग्राहकासंबंधी ॲक्सिस बँकेच्या ज्ञानात आणि ताब्यात असलेली कोणतीही आणि सर्व वैयक्तिक माहिती कोणत्याही अन्य बँक/संस्था/वित्तीय संस्था किंवा अन्य कोणत्याही संस्थेला उघड करण्याचा अधिकार असेल. हे कलम हा करार संपुष्टात आल्यावरही कायम असेल.

माहितीची अचूकता

- ग्राहक सेवांच्या वापराद्वारे किंवा ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या वापराद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमांद्वारे बँकेला पुरवलेल्या माहितीच्या अचूकतेची जबाबदारी घेतो.
- ग्राहक याद्वारे हे मान्य करतो की, या सेवांच्या संदर्भात त्याने पुरवलेल्या माहितीत कोणतीही विसंगती आढळल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी ग्राहकावरच राहील

फक्त आणि अशा प्रकारे ॲक्सिस बँकेला नेहमी अचूक माहिती देण्यास सहमत आहे. ॲक्सिस बँकेने पुरवलेल्या माहितीत त्रुटी असल्याचा संशय ग्राहकाला असल्यास, त्याने बँकेला ताबडतोब कळवावे. ॲक्सिस बँक सर्वोत्तम प्रयत्नाच्या आधारावर शक्य तिथे त्वरित त्रुटी दुरुस्त करण्याचा प्रयत्न करेल.

- ग्राहकाला प्रदान केलेल्या माहितीची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी बँकेद्वारे आवश्यक पावले उचलली जात असतानाही उद्भवलेल्या कोणत्याही आनुषंगिक त्रुटीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही आणि बँकेने दिलेल्या चुकीच्या माहितीच्या परिणामी ग्राहकाचे कोणतेही

नुकसान/हानी झाल्यास ग्राहक ॲक्सिस बँकेवर कोणताही दावा करणार नाही.

समाप्ती

- ॲक्सिस बँक, त्यांच्या विवेकबुद्धीनुसार, ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या सेवा पूर्णपणे किंवा अंशतः, कोणत्याही वेळी ग्राहकास पूर्वसूचना न देता, तात्पुरत्या थांबवू शकते किंवा समाप्त करू शकते. जेव्हा कोणतेही देखभाल कार्य किंवा दुरुस्ती करणे आवश्यक आहे किंवा कोणत्याही आपत्कालीन स्थितीत किंवा तांत्रिक किंवा सुरक्षा कारणांसाठी सेवांचे निलंबन आवश्यक आहे तेव्हा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय ॲक्सिस बँक कोणत्याही वेळी सेवा निलंबित करू शकते.
- ग्राहकाचे खाते बंद झाल्यास, सेवा आपोआप संपुष्टात येतील.
- जर ग्राहकाने या अटी व शर्तींचे उल्लंघन केले असेल किंवा ॲक्सिस बँकेला वापरकर्त्याचा मृत्यू, दिवाळखोरी किंवा त्याच्या कायदेशीर अक्षमतेबद्दल समजले असेल तर ॲक्सिस बँक पूर्व सूचना न देता सेवा निलंबित किंवा समाप्त करू शकते.
- लागू कायदा किंवा नियमांद्वारे अन्यथा निर्दिष्ट केल्याशिवाय, ॲक्सिस बँक या सेवा संपुष्टात आणण्याचा आणि/किंवा या सेवांचा वापर करून केले जाणारे व्यवहार वाढविण्याचा, कमी करण्याचा किंवा निलंबित करण्याचा, कोणत्याही वेळी, ग्राहकाला कोणतीही पूर्वसूचना न देता सुरक्षा समस्यांनुसार या सेवांशी संबंधित प्रक्रिया आणि व्यवहार मर्यादा बदलण्याचा अधिकार राखून ठेवते.

अस्वीकृती

ॲक्सिस बँक या प्रकरणात कोणत्याही दायित्वापासून मुक्त असेल:

आवश्यक भौगोलिक श्रेणीमध्ये नसणे किंवा नैसर्गिक आपत्तींसह इतर कोणत्याही कारणासह परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या अनपेक्षित घटनांमुळे ग्राहक सेवा प्राप्त करण्यात अयशस्वी

ठरतो; टेलिकम्युनिकेशन नेटवर्कमधील तांत्रिक त्रुटी किंवा ॲक्सिस बँकेच्या प्रत्यक्ष नियंत्रणाबाहेरील इतर कोणत्याही कारणांमुळे कायदेशीर प्रतिबंध, बँक जबाबदार राहणार नाही. तसेच, वरील नमूद कारणांमुळे सेवेत झालेल्या कोणत्याही त्रुटीमुळे; ग्राहक किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस होणाऱ्या थेट किंवा अप्रत्यक्ष नुकसानीबाबत उद्‌भवणाऱ्या कोणत्याही दायित्वापासून बँक यान्वये पूर्णतः मुक्त राहील.

ग्राहक ॲक्सिस बँकेला प्राप्त झालेल्या कोणत्याही व्यवहार सूचनांवर सद्‌भावनेने कार्य करीत आहे; ग्राहकाच्या एम-पिन, पासवर्ड, पासकोड, ओटीपी किंवा मोबाईल फोन/मोबाईल फोन नंबरचा कोणताही अनधिकृत वापर केला जाऊन, त्याद्‌वारे कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीच्या, पुनरावृत्तीच्या किंवा चुकिच्या व्यवहारसूचना दिल्या गेल्यास;

- प्रक्रिया किंवा संप्रेषणादरम्यान कोणतीही माहिती गमावणे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीद्‌वारे अनधिकृत ॲक्सेस किंवा गोपनीयतेचे उल्लंघन.
- सेवा प्रदाते किंवा कोणत्याही तृतीय पक्षाकडून या सेवांवर परिणाम करणारा कोणताही खंड किंवा बिघाड उद्‌भवल्यास आणि ॲक्सिस बँक अशा कोणत्याही सेवा प्रदात्याने किंवा कोणत्याही तृतीय पक्षाने प्रदान केलेल्या सेवेच्या गुणवत्तेबद्‌दल कोणतीही हमी देत नाही.

ॲक्सिस बँक सदर सेवांच्या संदर्भात ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्‌वारे प्रसारित झालेल्या, वैयक्तिक असोत वा अन्य, अशा संदेशांची किंवा सूचनांची गोपनीयता किंवा सुरक्षितता याची हमी देत नाही. ॲक्सिस बँक प्रणाली आणि नेटवर्क किंवा त्यांच्या कार्यक्षमतेसंबंधी कोणत्याही प्रकारची हमी देत नाही किंवा प्रतिनिधित्व करत नाही, तसेच सेवांच्या परिणामी किंवा त्यांच्या संदर्भात ग्राहक किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस झालेले कोणतेही नुकसान, ते कधीही आणि कसेही झालेले असो, त्याची जबाबदारी घेत नाही. ॲक्सिस बँक, तिचे संचालक आणि कर्मचारी, एजंट किंवा कंत्राटदार हे कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा परिणामी नुकसान किंवा हानीसाठी जबाबदार असणार नाहीत; ज्यात महसूल, नफा, व्यवसाय, करार, अपेक्षित बचत किंवा सद्‌भावना यांचे नुकसान, तसेच सॉफ्टवेअरसह कोणत्याही उपकरणाच्या वापराचे किंवा मूल्याचे नुकसान यांचा समावेश आहे, परंतु ते तेवढ्यापुरते मर्यादित नाही. बँकेने विनंती प्राप्त करण्यात व त्यावर प्रक्रिया करण्यात, आणि प्रतिसाद तयार करून परत पाठवण्यात झालेला कोणताही विलंब, व्यत्यय, निलंबन किंवा त्रुटी; किंवा ग्राहकाच्या दूरसंचार उपकरणापासून आणि नेटवर्कमधून (सेवा पुरवठादाराच्या नेटवर्कसह) बँकेच्या प्रणालीपर्यंत

कोणत्याही माहितीचे किंवा संदेशाचे प्रसारण करताना झालेले कोणतेही अपयश, विलंब, व्यत्यय, निलंबन, निर्बंध किंवा त्रुटी; किंवा ग्राहकाचे दूरसंचार उपकरण, बँकेची प्रणाली किंवा सेवा पुरवठादाराचे नेटवर्क आणि/किंवा सेवा पुरवण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही तृतीय पक्षाच्या प्रणालीत झालेला कोणताही बिघाड, खंड, निलंबन किंवा अपयश यामुळे ग्राहकास किंवा कोणत्याही व्यक्तीस झालेले, पूर्वानुमान करण्यायोग्य असो वा नसो, कोणतेही नुकसान झाल्यास बँक जबाबदार राहणार नाही.

या नियम व अटींमध्ये याच्या विपरीत काहीही नमूद केले असले तरीही, ग्राहक आणि सेल्युलर सेवा पुरवठादार किंवा कोणताही तृतीय पक्ष सेवा पुरवठादार (बँकेने त्यासाठी नियुक्त केलेला असो वा नसो) यांच्यातील कोणत्याही विवादात ॲक्सिस बँक सहभागी असणार नाही आणि ग्राहकाप्रती कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

ग्राहकाच्या स्पष्ट किंवा निहित परवानगीने कोणत्याही अन्य व्यक्तीने या सेवांचा वापर केल्यामुळे ग्राहकाला झालेले नुकसान. ग्राहकाच्या निर्देशांची पूर्तता करण्यासाठी सेवा वापरताना पाठवण्यात येणाऱ्या वैयक्तिक किंवा खातेविषयक माहितीची गोपनीयता, गुप्तता आणि सुरक्षितता यासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

बँकेने तृतीय पक्षाला वैयक्तिक माहिती उघड केल्यामुळे ग्राहकाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही, यात सांख्यिकीय विश्लेषणासाठी किंवा क्रेडिट रेटिंगसाठी, कायदेशीर निर्देशांचे पालन करून कोणत्याही दूरसंचार किंवा इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग नेटवर्कमध्ये सहभागी होण्यासारखी समावेशक परंतु त्यापुरतेच मर्यादित नसलेली कारणे समाविष्ट आहेत.

ॲक्सिस बँकेने समर्थित असणारी उपकरणे, सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म, आवृत्त्या, नेटवर्क, पद्धती आणि डेटा सेवा निवडण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. वेळोवेळी ॲक्सिस बँक अधिकृतपणे समर्थित साधने, तंत्रज्ञान आणि आवृत्ती प्रकाशित करेल ज्यामध्ये विविध साधनांच्या ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या वापरासाठी लागू असलेल्या अटी व शर्ती असतील. ग्राहक सर्व वेळी या अटी व शर्तींचे पालन करेल. प्रकाशित केलेल्या या आवश्यक अटींचे उल्लंघन करण्याचा कोणताही प्रयत्न, किंवा असमर्थित आवृत्त्यांमध्ये बदल करून ॲक्सिस मोबाईल

ॲप्लिकेशनमध्ये वापरण्याचा प्रयत्न करणे, हे अनधिकृत वापर आणि या नियम व अटी दस्तऐवजाचे उल्लंघन मानले जाईल.

ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन सेवांमध्ये सुधारणा/बदल

ॲक्सिस बँक या अटी व शर्तींमध्ये, ग्राहकास कोणतीही पूर्वसूचना न देता, कोणत्याही वेळी योग्य वाटतील तसे बदल करण्याचा संपूर्ण स्वेच्छाधिकार राखून ठेवते. अशा कोणत्याही दुरुस्तीची माहिती वेबसाईट http://www.axisbank.com वर प्रदर्शित करून ग्राहकाला दिली जाईल; आणि ग्राहक अशा सुधारित अटी व शर्तींद्वारे बांधील असेल.

संप्रेषण

ॲक्सिस बँक आणि ग्राहक या अटी व शर्तींनुसार सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ग्राहकाच्या मेलबॉक्सवर देऊ शकतात (ज्या लेखी स्वरूपात दिलेल्या समजल्या जातील) किंवा लिखित स्वरूपात प्रत्यक्ष हस्तांतरणाद्वारे किंवा पोस्टाने ग्राहकाने दिलेल्या शेवटच्या पत्त्यावर पाठवू शकतात; आणि ॲक्सिस बँकेच्या बाबतीत, सूचना खालील त्यांच्या कार्यालयीन पत्त्यावर पाठवू शकतात- सेवा गुणवत्ता विभाग, ॲक्सिस बँक लिमिटेड, कॉर्पोरेट कार्यालय, बॉम्बे डाईंग मिल्स कंपाउंड, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - 400025, दूरध्वनी: (022) 24252525. तसेच, ॲक्सिस बँक सेवांच्या सर्व ग्राहकांना लागू असणाऱ्या सेवा आणि अटी व शर्तींसंदर्भातील सर्वसाधारण स्वरूपाच्या सूचना http://www.axisbank.com या वेबसाईटवर प्रदर्शित करेल आणि/किंवा ग्राहकाच्या मोबाईल नंबरवर शॉर्ट मेसेजिंग सर्व्हिस ("एसएमएस") च्या माध्यमातून पाठवलेल्या अनुरूप संदेशांद्वारे आणि सूचनांद्वारे देखील निर्गमित करेल. याव्यतिरिक्त

ॲक्सिस बँक सर्व सेवांच्या ग्राहकांसाठी लागू असलेल्या सामान्य स्वरूपाची सूचना देखील प्रकाशित करू शकते. अशा सूचना प्रत्येक ग्राहकाला वैयक्तिकरित्या प्रदान केल्याचे मानले जाईल. समायोजन आणि धारणाधिकाराचा हक्क - ॲक्सिस बँकेला, सध्याच्या तसेच भविष्यातील इतर कोणत्याही धारणाधिकार किंवा भार यांच्या विचारात न घेता, ग्राहकास सेवा प्रदान केल्यामुळे आणि/किंवा ग्राहकाने ॲप्लिकेशन वापरल्यामुळे उद्भवणाऱ्या सर्व थकीत रकमांच्या मर्यादेपर्यंत, खातेमध्ये किंवा वॉलेटमध्ये अथवा इतर कोणत्याही खातेमध्ये, मग ते

खाते सिंगल असो वा जाॅइंट, ठेवलेल्या डिपॉझिट/स्क्रिप्ट्सवर समायोजनाचा आणि धारणाधिकाराचा हक्क असेल.

शासित कायदा आणि अधिकारक्षेत्र

या अटी व शर्तींची संरचना, वैधता आणि कार्यप्रदर्शन सर्व बाबतीत भारताच्या कायद्यांद्वारे नियंत्रित केले जाईल. याद्वारे हे पक्ष मुंबई, भारतातील सक्षम न्यायालयांच्या अनन्य अधिकारक्षेत्रास सादर करतात ज्या न्यायालयांना या प्रकरणातील अन्य न्यायालये वगळण्याबाबत अधिकार क्षेत्र असेल, अशा अन्य न्यायालयांना या प्रकरणामध्ये समान अधिकार क्षेत्र आहे की नाही याची पर्वा न करता. भारताशिवाय इतर कोणत्याही देशाच्या कायद्यांचे पालन न करण्यासाठी जेथे सेवा ॲक्सेस करण्यायोग्य असेल त्याच्या अनुपालनातून उद्भवणाऱ्या, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याही दायित्वाला ॲक्सिस बँक नकार देते.

अनपेक्षित घटना

यामध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही विरोधी तरतुदी विचारात न घेता, जर या करारानुसार बँकेची कर्तव्ये पूर्ण करण्यात आलेले कोणतेही अपयश किंवा विलंब खालील कारणांमुळे उद्भवले असेल किंवा संबंधित असेल, तर बँक कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही: दैवी आपत्ती, पूर, दुष्काळ, भूकंप, भूस्खलन, हरिकेन, चक्रीवादळ, टायफून, महामारी/साथीचा रोग, दुष्काळी परिस्थिती, आग, स्फोट, दंगल किंवा नागरी अशांतता, युद्ध (घोषित असो वा अघोषित), सार्वजनिक शत्रुत्वाचे कृत्य, दहशतवादी कारवाई, लष्करी कारवाई, शासन किंवा नियामक आदेश/अधिसूचनाद्वारे घोषित लॉकडाउन, शासन/इतर प्राधिकरणांची इतर कारवाई, न्यायालयाचा आदेश, किंवा उद्योग-व्यापी/प्रदेश-व्यापी/देश-व्यापी संप, टाळेबंदी, वर्क-टू-रूल, काम मंदावणे किंवा तत्सम कामगार कृती, वीज किंवा इतर पुरवठ्यात सर्वसाधारण बिघाड, तांत्रिक बिघाड, अपघाती किंवा यांत्रिक किंवा विद्युत बिघाड, संगणक/नेटवर्क बिघाड किंवा कोणत्याही पैसा हस्तांतरण, पेमेंट गेटवे किंवा कोअर बँकिंग प्रणालीतील बिघाड, तांत्रिक अडथळे, किंवा बँकेच्या वाजवी नियंत्रणाबाहेरील इतर कोणतीही परिस्थिती ("अनपेक्षित घटना"). बँक त्यांच्या विवेकबुद्धीनुसार अनपेक्षित घटनेदरम्यान सेवा सुरू ठेवू शकते किंवा सेवा निलंबित किंवा समाप्त करू शकते.

नुकसानभरपाई

- ॲक्सिस बँकेने ग्राहकाला सेवा आणि ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन आणि/किंवा सेवा पुरवण्यास सहमती दिल्याबद्दल प्रतिफल म्हणून, ग्राहक ॲक्सिस बँक, तिचे संलग्न, उपकंपन्या आणि त्यांचे संबंधित कर्मचारी, संचालक, सल्लागार, एजंट, कन्सल्टंट्स, वारस, प्रतिनिधी आणि/किंवा हस्तांतरित व्यक्ती (यापुढे ज्यांना "क्षतिपूर्तीधारक" म्हणून संबोधले जाईल) यांना याद्वारे, स्वतःच्या खर्चाने, अपरिवर्तनीयपणे क्षतिपूर्ती करण्यास, बचाव करण्यास आणि कोणताही धोका न पोहोचवण्यास; तसेच वेळोवेळी जशी स्थिती असेल तसे, आणि कोणत्याही मर्यादेशिवाय, सर्व प्रत्यक्ष आणि/किंवा अप्रत्यक्ष (तृतीय पक्षासहित) दावे, खर्च, नुकसान, मागण्या, दावे, कार्यवाही, कृती, खर्च, दंड, तोटे, दायित्वे, भरपाई, दंड आणि/किंवा वकिलांचा खर्च/खर्चासह कोणत्याही स्वरूपाचे अभियोग ("नुकसानी") यांपासून पूर्णपणे वाचवण्यासाठी सहमत होतो. ही नुकसानी जी क्षतिपूर्तीधारकाला सेवांच्या वापरामुळे आणि/किंवा ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन सेवांच्या वापराद्वारे सुरू केलेल्या कोणत्याही व सर्व व्यवहारांमुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या उद्भवली आहेत किंवा त्यांच्याशी संबंधित आहेत, मग ते व्यवहार ग्राहकाच्या माहितीसह असोत किंवा माहितीशिवाय, किंवा ते सद्भावनेने सुरू केले गेले असोत किंवा अन्यथा; आणि जे व्यवहार, ग्राहक याद्वारे मान्य करतो की, क्षतिपूर्तीधारकाने ग्राहकाच्या व्यवहार सूचनांवर आणि ग्राहकाच्या अधिकारावर, या अटी व शर्तीनुसार आणि लागू असलेल्या इतर विशिष्ट अटी व शर्तीनुसार, जसे असेल तसे, प्रक्रिया केले आहेत. ग्राहक पुढे सहमत होतो आणि पुष्टी करतो की, सेवा आंशिकरीत्या मागे घेतल्या गेल्या तरीही ही क्षतिपूर्ती कायम राहील आणि ग्राहकावर बंधनकारक असेल.
- ग्राहक याद्वारे क्षतिपूर्तीधारकाने निश्चित केलेल्या आणि अशा कोणत्याही नुकसानीची क्षतिपूर्ती करण्यासाठी पुरेशी मानलेल्या रकमेचे, मागणी केल्यावर अदा करण्यास सहमत होतो; असे नुकसान प्रत्यक्षात उद्भवलेले नसेल किंवा स्वरूपाने संभाव्य असले तरीही.

जोखीम

ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन वापरून, ग्राहक डिजिटल आणि मोबाईल बँकिंग सेवांशी संबंधित जोखीम स्वीकारतो आणि समजून घेतो. ॲक्सिस बँक मजबूत सुरक्षा उपाययोजना प्रदान करण्याचा प्रयत्न करत असली तरी, बँकेच्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे बँक संपूर्ण सुरक्षिततेची हमी देऊ शकत नाही, हे ग्राहक मान्य करतो. ग्राहक स्पष्टपणे सहमत आहे आणि खालील संभाव्य जोखीमांना मान्य करतो:

1. अनधिकृत प्रवेश: जर ग्राहकाचे क्रेडेन्शियल्स, ज्यामध्ये एम-पिन, पासवर्ड किंवा मोबाईल डिव्हाईस सिक्युरिटी सेटिंग्सचा समावेश आहे ते बाधित झाल्यास अनधिकृत ॲक्सेस होऊ शकतो. ग्राहक सहमत आहे की या क्रेडेन्शियल्सची गोपनीयता राखणे ही त्यांची एकमेव जबाबदारी आहे.

2. मोबाईल उपकरणाचे नुकसान किंवा चोरी: ग्राहकाच्या मोबाईल फोनचे नुकसान किंवा चोरी संवेदनशील बँकिंग डाटा उघड करू शकते. अनधिकृत ट्रान्झॅक्शनची जोखीम वाढवू शकते. अशा परिस्थितीत त्यांच्या खातेचा ॲक्सेस ब्लॉक करण्यासाठी ॲक्सिस बँकेला त्वरित सूचित करणे ही ग्राहकाची जबाबदारी आहे.

3. सायबर-हल्ला: ग्राहक हे मान्य करतो की, मोबाईल बँकिंग सेवा सायबर धमक्यांसाठी संवेदनशील आहेत, ज्यात हॅकिंग, मालवेअर, रॅन्समवेअर आणि व्हायरस यांचा समावेश आहे, आणि या धमक्या वैयक्तिक व आर्थिक माहिती धोक्यात आणू शकतात.

4. फिशिंग आणि सोशल इंजिनीअरिंग हल्ला: ग्राहकांना फिशिंग ईमेल, बनावट वेबसाइट्स, कॉल्स, संदेश किंवा इतर फसव्या पद्धतींनी संवेदनशील बँकिंग क्रेडेन्शियल्स मिळवण्यासाठी लक्ष्य केले जाऊ शकते. ग्राहकाने सतर्क आणि सावध राहावे, तसेच संशयास्पद विनंत्यांना उत्तर देणे टाळावे.

5. मालवेअर हल्ले: मोबाईल उपकरणांवर त्रुटीयुक्त सॉफ्टवेअर (मालवेअर) इंस्टॉलेशनमुळे वैयक्तिक डाटा, लॉग-इन क्रेडेन्शियल आणि व्यवहाराचे तपशिल यामध्ये अनधिकृत ॲक्सेस होऊ शकतो. ग्राहकांनी त्यांचे उपकरण विश्वसनीय सुरक्षा सॉफ्टवेअरसह संरक्षित असल्याची खात्री करणे आवश्यक आहे आणि अविश्वसनीय स्रोतांकडून ॲप्लिकेशन्स डाउनलोड करणे टाळणे आवश्यक आहे.

6. प्रक्रिया त्रुटी: सिस्टीमच्या त्रुटी, सॉफ्टवेअर बग किंवा मानवी इनपुट त्रुटींमुळे, प्रक्रियेत चुका उद्‌भवू शकतात, ज्यात व्यवहार अयशस्वी होणे देखील समाविष्ट आहे. ग्राहक स्पष्टपणे सहमत होतो की, बँकेच्या गहन उपेक्षा किंवा जाणूनबुजून केलेल्या चुकीमुळे झालेल्या घटनांचा अपवाद वगळता, अशा कोणत्याही त्रुटी किंवा नुकसानाबद्‌दल ॲक्सिस बँक जबाबदार ठरणार नाही.

7. व्यवहारांमधील जोखीम: तांत्रिक समस्या, नेटवर्कमधील बिघाड, सर्व्हर डाउनटाइम, किंवा व्यवहार प्रक्रिया त्रुटींमुळे, मोबाईल बँकिंगद्वारे केलेले व्यवहार कधीकधी विलंब, अपयश किंवा अचूकतेचा अभाव दर्शवू शकतात. ॲक्सिस बँक त्याच्या वाजवी नियंत्रणाबाहेरील अशा व्यवहारातील व्यत्ययामुळे उद्भवणाऱ्या नुकसानीसाठी जबाबदार असणार नाही.

8. सुरक्षा उल्लंघन: जरी सक्षम सायबरसुरक्षा पायाभूत सुविधा लागू असल्या तरीही, अनधिकृत प्रवेश, हॅकिंग प्रयत्न किंवा डेटा उल्लंघन यांचा काही प्रमाणात धोका कायम राहतो. ग्राहक मान्य करतात की बँकेच्या वाजवी नियंत्रणाबाहेर असलेल्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही.

9. डेटा उल्लंघने: ग्राहक हे जाणतो की ॲक्सिस बँकद्वारे विवेकपूर्ण प्रयत्नांनंतरही डेटा उल्लंघने घडू शकतात. अशा उल्लंघनांमुळे संवेदनशील वैयक्तिक आणि आर्थिक माहिती उघड होऊ शकते, ज्यामुळे ओळख चोरी, आर्थिक फसवणूक आणि गोपनीयतेचा भंग होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

10. तृतीय-पक्ष सेवा प्रदाते: ॲक्सिस बँक काही सेवांसाठी तृतीय-पक्ष सेवा प्रदात्यांना नियुक्त करू शकते. ग्राहकास माहिती आहे की तृतीय-पक्ष सेवा प्रदात्यांवर अवलंबून राहणे काही धोके घेऊन येऊ शकते, ज्यात अशा तृतीय-पक्षांद्वारे सेवा अपयश किंवा डेटा सुरक्षिततेचे उल्लंघन होणे यांचा समावेश आहे. बँक तृतीय-पक्ष संस्थांद्वारे झालेल्या कोणत्याही डाटा उल्लंघन किंवा सेवा अपयशासाठी जबाबदार राहणार नाही.

11. सेवा अनुपलब्धता: कधी कधी, नियोजित देखभाल, सिस्टीम अपडेट्स किंवा अनपेक्षित तांत्रिक समस्यांमुळे मोबाईल बँकिंग सेवा विस्कळीत होऊ शकतात. ग्राहक समजतात आणि स्वीकारतात की अशा कालावधीत बँकिंग सेवांचा ॲक्सेस करण्यास होणारा कोणताही विलंब, व्यत्यय किंवा असमर्थतेसाठी ॲक्सिस बँक जबाबदार धरली जाणार नाही.

12. इंटरनेट आणि दूरसंचार जोखीम: मोबाईल बँकिंग सेवा मोठ्या प्रमाणावर इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि दूरसंचार सेवांवर अवलंबून आहेत, ज्या खंडित होऊ शकतात, कनेक्शन कमजोर असू शकते, नेटवर्क समस्या निर्माण होऊ शकतात किंवा इतर पायाभूत सुविधांमध्ये अपयश येऊ शकते. ग्राहक या जोखीमांना मान्य करतो आणि सहमत आहे की अशा घटकांमुळे झालेल्या व्यत्ययासाठी ॲक्सिस बँक जबाबदार नाही.

13. नियामक आणि कायदेशीर जोखीम: मोबाईल बँकिंग नियामक फ्रेमवर्क, मार्गदर्शक तत्त्वे आणि अनुपालन आवश्यकतांमधील बदलांच्या अधीन आहे. कायदा किंवा नियमांमधील बदल मोबाईल बँकिंग सेवांच्या कार्यक्षमता, उपलब्धता किंवा सुरक्षा मानकांवर परिणाम करू शकतात.

ग्राहक सहमत आहे की बँकिंग सेवांच्या वापरातील या किंवा इतर जोखीमांमुळे होणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, प्रासंगिक किंवा परिणामी नुकसानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही.

जोखीम कमी करण्यासाठी ग्राहकाची कर्तव्ये:

- मोबाईल ॲप्लिकेशन्स आणि ऑपरेटिंग सिस्टीम नियमितपणे नवीन आवृत्तींमध्ये अपडेट करा.
- मोबाईल उपकरणांवर बायोमेट्रिक प्रमाणीकरण, पासवर्ड आणि पिन संरक्षण यांसह सक्षम आणि सुदृढ सुरक्षा उपाय सक्षम करून त्यांचे नियमितपणे पालन करावे.
- बँकिंग व्यवहार करण्यासाठी असुरक्षित सार्वजनिक वाय-फाय नेटवर्कचा वापर टाळावा.
- कोणत्याही संशयास्पद किंवा अनधिकृत व्यवहारांचे वेळेवर निदान होण्यासाठी खाते स्टेटमेंट आणि व्यवहार अलर्ट नियमितपणे तपासावेत.
- मोबाईल उपकरणे किंवा बँकिंग क्रेडेन्शियल्स हरवणे, चोरी जाणे किंवा त्यांची सुरक्षितता धोक्यात येणे याबाबत त्वरित ॲक्सिस बँकेला कळवावे.
- वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती मागणाऱ्या अनाहूत संपर्कांना प्रतिसाद देताना ग्राहकांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.
- सुरक्षा राखण्यासाठी आणि असुरक्षितता कमी करण्यासाठी नियमितपणे पासवर्ड आणि एम-पिन बदला.

ॲक्सिस बँक उपाययोजना:

- ॲक्सिस बँक ग्राहक डेटाचे संरक्षण करण्यासाठी एन्क्रिप्शन, फायरवॉल्स, सुरक्षित प्रमाणीकरण पद्धती आणि नियमित सुरक्षा ऑडिटसह प्रगत सुरक्षा उपायांचा वापर करते. या सर्व प्रयत्नांनंतरही जोखमींपासून पूर्णतः संरक्षण मिळेल याची हमी देता येत नाही, हे ग्राहक मान्य करतो.
- ग्राहक सहमत आहे की बँकद्वारे सिद्ध एकूण निष्काळजीपणा किंवा जाणीवपूर्वक गैरवर्तनाच्या प्रकरणांना वगळता, वर नमूद केलेल्या

जोखमींमुळे उद्भवणारे कोणतेही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, परिणामी किंवा आकस्मिक नुकसान, हानी, दावे, दायित्व किंवा ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या वापरातील इतर कोणत्याही जोखमींमुळे उद्भवणारे खर्च यासाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही.

- ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर पुढे चालू ठेवून, ग्राहक वरील जोखमी, त्यांच्या जबाबदाऱ्या आणि ॲक्सिस बँकेच्या दायित्वाच्या मर्यादा समजून घेणे आणि स्वीकृतीची पुष्टी करतो.

सुरक्षित बँकिंग

काय करावे आणि करू नये

- मोबाईल बँकिंग बँक, आरबीआय किंवा अशा इतर कोणत्याही संस्था कधीही तुमची वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती विचारणा करणारे ईमेल, एसएमएस किंवा कॉल करत नाहीत. अशा फसवणूकीला बळी पडू नका.
- ज्या संदेशातील किंवा प्रेषकाकडून आलेल्या युआरएल बद्दल आपण निश्चित नाही, अशा कोणत्याही लिंकवर क्लिक करू नये.
- एटीएम कार्ड वापरण्यासाठी किंवा शाखेत रोख रक्कम हाताळण्यासाठी अनोळखी व्यक्तींची मदत घेऊ नका आणि व्यवहार करताना त्यांना तुमच्यावर लक्ष ठेवू देऊ नका.
- सायबर कॅफे/शेअर्ड कॉम्प्युटरमधून तुमचे इंटरनेट बँकिंग खाते ॲक्सेस करणे टाळा. जर तुम्हाला असे करायचे असेल तर तुमच्या स्वत:च्या कॉम्प्युटरमधून तुमचे पासवर्ड बदला.
- व्यवहाराचे अलर्ट नियमितपणे मिळविण्यासाठी तुम्ही बँककडे अचूक मोबाईल नंबर अपडेट केला आहे याची खात्री करा.

सुरक्षित वापर मार्गदर्शक तत्त्वे

- अज्ञात ग्राहकांना ॲपचे ॲक्सेस देऊ नका.

- नेहमीच प्ले स्टोअर आणि ॲप स्टोअर सारख्या सुरक्षित स्रोतांमधून ॲप्लिकेशन डाउनलोड करा.
- 3rd पार्टीकडून किंवा अज्ञात स्रोतांमधून ॲप्लिकेशन डाउनलोड करणे टाळले पाहिजे.
- कलेक्शन विनंती स्वीकारण्यापूर्वी, मंजुरी अचूक व योग्य प्राप्तकर्त्यासच दिली गेली आहे याची ग्राहकाने दक्षतापूर्वक पुष्टी करावी.
- जर तुमचा मोबाईल नंबर बदलला असेल तर तुम्हाला एसएमएस नोटिफिकेशन सतत मिळत राहण्यासाठी तुमच्या नवीन मोबाईल नंबरविषयी बँकला सूचित करण्यास विसरू नका.
- कॉलर ट्यून्स डायलर ट्यून्स किंवा ज्ञात किंवा अज्ञात स्रोतांकडून ईमेल किंवा अटॅचमेंट उघडताना/डाउनलोड करताना सावध राहा.
- तुमच्या फोन/कॉम्प्युटरवर क्रेडिट कार्ड तपशील, मोबाइल बँकिंग पासवर्ड, ग्राहक आयडी इ. सारखी संवेदनशील माहिती स्टोअर करू नका.
- तुमचा पिन नियमितपणे बदला.
- सार्वजनिक ठिकाणी ब्ल्यूटूथ वापरताना सावध राहा कारण कोणीतरी तुमचा गोपनीय डाटा/माहिती ॲक्सेस करू शकेल.
- बँककडून आलेले असल्याचा दावा करणाऱ्या ई-मेल किंवा सोशल नेटवर्किंग साइटवरील लिंकवर क्लिक करू नये

जोखीम आणि ग्राहकाची जबाबदारी

- ग्राहकाने दिलेल्या मोबाईल नंबरवर आणि/किंवा ई-मेल पत्त्यावर बँक संबंधित अलर्ट तसेच खातेशी संबंधित माहिती पाठवेल. बँकेला प्रदान केलेला मोबाईल नंबर आणि ईमेल पत्ता अचूक आहे आणि बँकेच्या रेकॉर्डमध्ये अपडेट ठेवला आहे याची खात्री करणे ही ग्राहकाची पूर्णपणे स्वतःची जबाबदारी आहे.
- मोबाईल डिव्हाईस आणि ईमेल खातेच्या सुरक्षेचे संरक्षण करणे ही ग्राहकाची पूर्णपणे स्वतःची जबाबदारी आहे. संपर्क माहितीची अचूकता किंवा सुरक्षितता राखण्यात, अथवा त्यातील कोणताही बदल बँकेस कळविण्यात ग्राहकाकडून कोणतीही त्रुटी झाल्यास, त्याचे सर्वस्वी जोखीम व दायित्व ग्राहकावरच राहील. सदर सुविधा प्राप्त करणे सुरू ठेवण्यासाठी ग्राहकाने त्यांचा मोबाईल फोन आणि ईमेल आयडी सक्रिय ठेवणे ही ग्राहकाची जबाबदारी असेल.

- ग्राहक स्पष्टपणे मान्य करतो आणि स्वीकारतो की मोबाईल फोन आणि/किंवा ईमेलद्वारे माहिती पाठविणे मूलतः असुरक्षित आहे आणि काही जोखमींच्या अधीन आहे. अशा जोखीमा असूनही, ग्राहकाने, त्यांच्या स्वत:च्या सोयीसाठी आणि अशा जोखमींचे काळजीपूर्वक मूल्यांकन केल्यानंतर, या चॅनेल्सद्वारे प्राप्त झालेल्या सूचना किंवा संवादावर कार्य करण्यासाठी बँकेला स्वेच्छिकपणे विनंती केली आहे आणि अधिकृत केले आहे.
- ग्राहकाने आवश्यकतेनुसार खरी, संपूर्ण व योग्य माहिती प्रदान करणे अनिवार्य असून, बँकेस कोणत्याही वेळी दिलेल्या डेटाच्या अचूकतेबाबतची सर्वस्वी दायित्वे ग्राहकावरच राहील. ग्राहकाने पुरवलेल्या त्रुटीपूर्ण किंवा चुकीच्या माहितीमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी बँक जबाबदार धरली जाणार नाही.
- ग्राहकाला बँकेने दिलेल्या माहितीमध्ये त्रुटी असल्याचा संशय वाटल्यास, ग्राहकाने लगेचच बँकेला कळविणे आवश्यक आहे. दुरुस्ती शक्य असल्यास, बँक आपल्या सर्वोत्तम प्रयत्नांच्या तत्त्वावर संबंधित चूक सुधारण्याचा प्रयत्न करेल.
- ग्राहकाला अलर्ट किंवा मोबाईल बँकिंग सेवा ज्या मोबाईल नंबरवर व/किंवा ईमेल पत्त्यावर प्राप्त करावयाच्या आहेत, त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास, त्याची अधिसूचना ग्राहकाने कोणत्याही विलंबाविना बँकेकडे देणे आवश्यक असेल.
- सर्व खातेशी संबंधित व्यवहार लागू असलेल्या बँकिंग प्रथा तसेच ग्राहकाच्या खातेवर व संबंधित सेवांवर लागू असलेल्या वर्तमान अटी, शर्ती आणि नियमांच्या अधीन राहतील. तसेच, फोन बँकिंग आणि नेट बँकिंग सेवांशी संबंधित अटी व शर्ती, संबंधित मर्यादेपर्यंत, मोबाईल बँकिंग/अलर्ट सुविधेवरही लागू होतील.
- ग्राहक बँकेने ठरवलेल्या पात्रतेनुसार मोबाईल बँकिंग किंवा अलर्ट्स सुविधा वापरण्यासाठी विनंती करू शकतात. ग्राहक बँकेकडून वेळोवेळी ठरविलेल्या किंवा उपलब्ध करून दिलेल्या पद्धतीनुसार अलर्ट्स सुरू करणार्या घटनांचा प्रकार देखील निर्दिष्ट करू शकतो. बँक त्यांच्या विवेकबुद्धीनुसार आणि कोणतेही कारण न देता अशा कोणत्याही ॲप्लिकेशनला नाकारण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवते.

फायदे आणि वैशिष्ट्ये

प्री-लॉग-इन वैशिष्ट्ये

रिचार्ज

• हे विशेषतः त्या उपकरणांसाठी तयार केले आहे जे खालील ऑपरेटिंग सिस्टिम्सवर चालतात:. iOS आणि अँड्रॉईड, ग्राहकांना त्यांच्या संपर्क यादीतून कोणताही संपर्क क्रमांक निवडून रिचार्ज करण्याची सोय उपलब्ध आहे, त्यासाठी लॉग-इन करण्याची गरज नाही. फक्त तुमच्या उपकरणाच्या संपर्क यादीतील मोबाईल नंबर निवडा किंवा रिचार्जसाठी इच्छित कोणताही नंबर टाईप करा. रिचार्ज रक्कम टाईप करा, तुमच्या एम-पिनसह पुष्टी करा आणि रिचार्ज पूर्ण!

माझे नजीक

'माझे नजीक (निअर मी)' ट्रेंडची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ॲक्सिस बँक द्वारे उपलब्ध ओपन ॲप काही क्लिकमध्ये प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत करते. हे सर्व आहे! ऑगमेंटेड रिअलिटीच्या अत्याधुनिक व ट्रेंडिंग तंत्रज्ञानाची अंमलबजावणी ॲक्सिस बँकेच्या ओपन ॲपच्या बॅकएंडमध्ये आधीच केली गेली आहे. ॲक्सिस बँकेच्या ओपन ॲपमधील ऑगमेंटेड रिअलिटी फीचरच्या माध्यमातून, तुमच्या फोनच्या कॅमेराचा वापर करून तुम्ही (5 किलोमीटरच्या त्रिज्येच्या आतील सर्व) रेस्टॉरंट ऑफर्स, एटीएम, शाखा आणि गृह कर्ज साठी बँकेने पूर्व-मान्यताप्राप्त मालमत्ता देखील शोधू शकता. हे वैशिष्ट्य वापरण्यासाठी ग्राहकाला:

• प्री-लॉग-इन स्क्रीनच्या तळाशी दिलेल्या मेनूमधील माझे नजीक (निअर-मी) पर्यायावर टॅप करा

• वरच्या डाव्या कोपऱ्यातील माझे नजीक (निअर मी) हा पर्याय निवडलेला आहे याची खात्री करा

• आता तुम्ही शोधत असलेल्या बँकेची सेवा निवडा

• स्क्रीनवर वरच्या डाव्या कोपऱ्यातील बायनोक्युलर आयकॉन दाबा

• पर्यायांमधून एआर व्ह्यू निवडा

• हे ॲक्सिस बँकेद्वारे उपलब्ध केलेल्या ओपन ॲप्लिकेशनच्या ऑगमेंटेड रिअलिटी वैशिष्ट्याला सक्रिय करेल

याव्यतिरिक्त, तुम्ही तुमच्या शोधाचा व्यास बदलू शकता आणि तुमचा फोन 360 अंश हलवून तुमच्या आजूबाजूच्या सेवा पुरवणाऱ्या सर्व ठिकाणांना पाहू शकता. तुम्ही सर्व ठिकाणे एकत्रितपणे पाहण्यासाठी बर्ड आय व्ह्यू सक्षम करू शकता.

तुम्ही लोकेशन निवडून किंवा जीपीएस आधारित वैशिष्ट्य वापरून हे दोन्ही शोधू शकता.

सूचना: तुम्हाला या वैशिष्ट्यासाठी तुमच्या फोनवर प्रायव्हसी सेटिंग्ज अंतर्गत लोकेशन सेवा सक्षम करावी लागेल.

- डायनिंग डिलाईट्स:

o ॲक्सिस बँक डायनिंग डिलाईट्ससह तुमच्या शहरातील नवीन रेस्टॉरंट्स आणि स्वादांचा शोध घ्या. फक्त तुमचे ॲक्सिस बँक कार्ड वापरून अनेक शहरांमधील पार्टनर रेस्टॉरंटमध्ये किमान 15% सवलतीचा आनंद घ्या.

- एज रिवॉर्ड वापरून पेमेंट करा:

o आकर्षक ऑफरसह तुमचे एज रिवॉर्ड पॉईंट्स रिडीम करा.

- पूर्व-मंजूर प्रॉपर्टी:

o गृह कर्जसाठी ॲक्सिस बँकद्वारे पूर्व-मंजूर केलेल्या सर्व मालमत्ता शोधा.

- संडे ब्रंच:

o विशेष प्रसंग असो किंवा सुस्त रविवारची सुरुवात, ब्रंच हे आनंद साजरा करण्यासाठी किंवा व्यस्त आठवड्यानंतर रिलॅक्स करण्यासाठी परिपूर्ण जेवण आहे. ॲक्सिस बँक डायनिंग डिलाईट्स मुंबई आणि दिल्लीतील प्रमुख रेस्टॉरंट्समध्ये रविवारच्या ब्रंचवर 15%* सूट ऑफर करते. विशेष सवलतींचा आनंद घेण्यासाठी पार्टनर रेस्टॉरंटमध्ये फक्त तुमचे ॲक्सिस बँक क्रेडिट किंवा डेबिट कार्ड वापरा.

संपत्ती शोधा

प्रॉपर्टी सर्च वापरून प्रॉपर्टीज व प्रोजेक्ट्स शोधा आणि कर्जसाठी अप्लाय करा - सर्व काही एका ठिकाणी.

ऑफर्स

विविध व्यापाऱ्यांकडून क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग आणि डेबिट कार्ड वापरावर मिळणाऱ्या आकर्षक ॲक्सिस बँक ऑफर्सवर लक्ष ठेवा.

आत्ताच अप्लाय करा

फॉर्म भरून कोणत्याही ॲक्सिस बँक प्रॉडक्ट (सेव्हिंग्स खाते, क्रेडिट कार्ड आणि लोन्स) साठी सहजपणे अप्लाय करा

बिल पे

प्री-लॉग-इन सेक्शनमध्ये बिल पेमेंटची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे ग्राहक निवडलेल्या बिलर्सकडे सुलभपणे पोहोचू शकतात. बिलरची नोंदणी न करता बिल तात्काळ भरा. केवळ श्रेणी, ऑपरेटर, युनिक रेफरन्स आयडी आणि रक्कम टाका आणि तुमचे बिल लगेच भरले जाईल.

स्कॅन करा आणि पे करा

मर्चंट आऊटलेटवर आणि बिलांवरील क्यूआर कोड स्कॅन करून भारत क्यूआर वापरून किंवा यूपीआय क्यूआर स्कॅन करून पेमेंट करा. क्रेडिट किंवा डेबिट कार्ड बाळगण्याची किंवा इंटरनेट बँकिंगमध्ये लॉग-इन करण्याची गरज नाही.

पोस्ट-लॉग-इन वैशिष्ट्ये

खाती

- तुमचा खाते बॅलन्स पाहणी
- लघू विवरण पाहा (अंतिम 10 व्यवहार)
- तपशीलवार खाते विवरण पाहा (90 दिवसांपर्यंत
- खाते विवरण ईमेल करा (12 महिन्यांपर्यंत)
- फोटो आणि टोपणनावांसह खाते वैयक्तिकृत करणे

क्रेडिट कार्ड्स

- थकित बॅलन्स पाहणी
- बिल न केलेले व्यवहार पाहणी

- वर्तमान विवरण पाहणी
- मागील विवरण पाहणी
- त्वरित क्रेडिट कार्ड बिल भरणे
- क्रेडिट कार्ड बिल पेमेंट शेड्यूल करणे
- 2500 पेक्षा जास्त रकमेचे व्यवहार ईएमआय मध्ये रुपांतरित करणे
- ई-स्टेटमेंट ॲक्टिव्हेशन
- तुमच्या क्रेडिट कार्डवरील क्रेडिट लिमिट वाढीसाठी तपासणी करणे
- नवीन क्रेडिट कार्डसाठी अर्ज करणे
- ब्लॉक आणि रिप्लेस करणे, पिन सेट आणि रीसेट करणे, तसेच ऑटो डेबिट पेमेंट व्यवस्थापित करणे

यूपीआय

- तुमचा स्वतःचा यूनिक यूपीआय आयडी तयार करा आणि पैसे पाठवण्यासाठी किंवा घेण्यासाठी इतरांसोबत सामायिक करणे
- तुमच्या यूपीआय आयडी सह एकापेक्षा जास्त बँक खाते लिंक करणे
- तुमच्या मर्चंटच्या आऊटलेट आणि स्टोअरवर स्कॅन आणि त्वरित पेमेंट करणे
- सुट्टीच्या दिवसासह 24*7 सतत उपलब्धता
- कोणतेही व्यवहार खर्च नाही
- व्यवहार रेकॉर्ड ट्रॅक करणे
- ॲक्सिस बँक ओपनचे ग्राहक ॲक्सिस बँक यूपीआय पर्यायाद्वारे ओपन ॲपवर कोणतेही बँक खाते लिंक करू शकतात
    - पैसे पाठविणे
    - पैशांची विनंती करणे
    - यूपीआय ट्रान्झॅक्शन रेकॉर्ड पाहणी
    - यूपीआय वापरून स्कॅन करणे आणि देय करणे
    - यूपीआय क्यूआर कोड निर्माण करणे
    - युपीआय संबंधित प्रश्न नोंदविणे

बिल भरा

- नियमित बिल सादरीकरणासाठी बिलर जोडा
- बिल पाहा आणि पैसे भरा किंवा बिलरद्वारे अनुमती असलेली कोणतीही रक्कम थेट भरा

- तुमची बिले शेड्यूल करा आणि त्यांना (ॲपमधील) कॅलेंडरवर पाहा
- निश्चित मर्यादा-रकमेसाठी ऑटोपे सक्षम करून बिले स्वयंचलित पद्धतीने भरा

मनपसंत

- तुमच्या वारंवार करण्यात येणाऱ्या 10 व्यवहारांना मनपसंत म्हणून सेट करा आणि एका क्लिकमध्ये भरणा करा.

एफडी/आरडी

- ॲपमधून फिक्स्ड डिपॉझिट खाते आणि रिकरिंग डिपॉझिट खाते उघडा. ॲपमधूनच डिपॉझिट रक्कम, डिपॉझिट कालावधी आणि देय व्याजाचा प्रकार निवडा.

कर्ज

- तुम्ही घेतलेले सर्व कर्ज पाहा.
- एकूण थकित कर्ज रक्कम पाहा.
- नवीन कर्जासाठी अप्लाय करा.
- विवरणाची विनंती.
- आरओआय रेकॉर्ड

म्युच्युअल फंड

- एकूण गुंतवणूक बॅलन्स पाहा
- गुंतवणूकीचे वर्तमान मूल्य तपासा
- गुंतवणूकीवरील लाभ/नुकसान ट्रॅक करा

डिमॅट

- ॲक्सिस बँक ॲपद्वारे तुमच्या गुंतवणूकीचा सुरुवातीपासूनच ट्रॅक करा.
- डिमॅट सारांश पाहा
- मेन्यूमधून सर्व होल्डिंग्स, डिमॅट स्टेटमेंट तपासा तसेच नवीन डीआयएस बुकसाठी विनंती करा.

फॉरेक्स कार्ड्स

- बहु-चलन आणि एकल-चलन फॉरेक्स कार्डचे स्टेटमेंट तपासा

- ग्राहक त्याच्या/तिच्या कार्डवरील सर्व चलनांमधील उपलब्ध बॅलन्स आणि व्यवहाराचा रेकॉर्ड तपासू शकतो/शकते.
- ग्राहक त्याला/तिला जारी केलेल्या कार्डमध्ये फंड जमा करू शकतो तसेच ते कार्ड ब्लॉक देखील करू शकतो. बहु-चलन कार्ड ग्राहकांना 16 समर्थित चलनांपैकी (USD, EUR, GBP, SGD, AUD, CAD, SEK, JPY, CHF, AED, SAR, THB, HKD, NZD आणि ZAR) कोणत्याही चलनामध्ये फंड जमा करण्याची परवानगी देते, जे वैद्यकीय, शैक्षणिक अथवा इतर प्रवास-संबंधित खर्चांसाठी वापरले जाऊ शकते.

ॲक्सिस ॲक्टिव्ह

- काँटॅक्टलेस पेमेंट्ससाठी ॲक्सिस ॲक्टिव्ह बँक खरेदी करा आणि सोबत 6 महिन्यांचा GOQii Life प्लॅन आणि फिटनेस ट्रॅकिंग मिळवा.
- फिटनेस गोल्स पूर्ण केल्यावर ॲक्सिस एज रिवॉर्ड्स मिळवा.

रिवॉर्ड पॉइंट्स

- तुमचे रिवॉर्ड पॉईंट्स बॅलन्स पाहा आणि रिडीम करा
- तुमचे पॉईंट्स अन्य बँक खातेमध्ये ट्रान्सफर करा
- रिवॉर्ड स्टोअर ॲक्सेस करा आणि थेट रिचार्ज आणि बुकिंग सुविधा वापरा

आत्ताच अप्लाय करा

- नवीन बचत बँक खाते उघडा (निवडक शहरांमध्ये उपलब्ध)
- नवीन क्रेडिट कार्ड, वैयक्तिक कर्ज, कार कर्ज, गृह कर्ज किंवा सुवर्ण कर्जासाठी अप्लाय करा
- सर्व पूर्व-मंजूर ऑफर्स पाहा
- कोणत्याही ॲक्सिस बँक शाखेत लॉकर बुक करा. हे निवडलेल्या शाखेत लॉकर उपलब्धतेच्या अधीन आहे.
- पूर्व-मंजूर ऑफर

सेटिंग्स

- व्यवहार मर्यादा पाहा आणि सुधारित करा.
- एम-पिन बदला

- ॲक्सिस बँकद्वारे उघडलेली नोंदणी रद्द करा
- खाते रिफ्रेश करा
- iOS ग्राहकांसाठी टच आयडी/फेस आयडी; अँड्रॉईड ग्राहकांसाठी फिंगरप्रिंट बायोमेट्रिक

सेवा

- नवीन चेकबुकसाठी विनंती
- जारी केलेल्या चेकची स्थिती पाहणी
- चेक जारी करणे थांबविणे
- ई-स्टेटमेंटसाठी ईमेल आयडी नोंदणी
- ई-स्टेटमेंटसाठी ईमेल आयडी अपडेशन
- अलीकडील विनंत्या पाहणी
- ॲक्सिस वॉच (iOS ग्राहकांसाठी लागू)
- ईमेल आयडी अपडेशन (I)
- पॅन अपडेशन (I)
- संपर्काचा पत्ता अपडेशन (I)
- कायमस्वरुपी पत्ता अपडेशन (I)
- केवायसी तपशिलाची पुष्टी (I)
- नावाचे अपडेशन (I)
- जन्मतारीख अपडेशन (I)
- आधारद्वारे पत्ता अपडेशन(I)
- नियोक्त्याचे नाव अपडेशन (I)
- आधार कार्ड लिंक करणे (I)
- फॉर्म 15G/H सादर करणे (I)
- खाते हस्तांतरित करणे (I)
- फॉर्म 60 (I)
- *पासपोर्ट अपडेट करणे (एनआरआय) (I)
- *व्हिसा अपडेट करणे (एनआरआय) (I)
- कर्ज बंद करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र (I)
- आधार कार्ड अपडेट करणे
- निष्क्रिय खाते सक्रिय करणे

बचत/चालू खाते

- बँक खाते तपशील ॲक्सेस करणे
- बचत/चालू खात्या सह नोंदणीकृत ईमेल आयडी अपडेट करणे
- ई-स्टेटमेंटसाठी नोंदणी करणे
- नवीन चेकबुकसाठी विनंती करणे
- जारी केलेल्या चेकची स्थिती पाहणी
- जारी केलेला चेक थांबविणे
- तुमचा एमएमआयडी तपासणे
- P2M आयएमपीएस व्यवहारासाठी ओटीपी निर्माण करणे
- अलीकडील विनंती पाहणी

क्रेडिट कार्ड

- क्रेडिट कार्डसाठी अर्ज करणे
- क्रेडिट कार्डसाठी अर्ज करणे
- कार्ड ब्लॉक आणि रिप्लेस करणे
- मर्यादा वाढविण्यासाठी तपासणी
- बिल न केलेले व्यवहार किंवा वर्तमान बिल ईएमआयमध्ये मध्ये रुपांतरित करणे
- ई-स्टेटमेंट ॲक्टिव्हेशन
- क्रेडिट कार्डवर त्वरित कर्ज
- क्रेडिट कार्ड पिन सेट/रिसेट करणे

डेबिट कार्ड

- कोणताही गैरवापर टाळण्यासाठी डेबिट कार्ड ब्लॉक करणे
- तुमच्या डेबिट कार्डवर एटीएम आणि खरेदी मर्यादा सुधारित करणे
- डेबिट कार्ड पिन सेट/रिसेट करणे
- सर्व डेबिट कार्ड व्यवहार थांबविण्यासाठी डेबिट कार्ड ऑन/ऑफ करणे
- डेबिट कार्ड अपग्रेड करणे

माझे विशेषाधिकार

• हा विभाग प्रेस्टीज, प्रायॉरिटी आणि बरगंडी ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. येथे, ग्राहक त्यांच्या खात्यासाठी विशिष्ट पात्रता/ऑफर/विशेषाधिकार पाहू शकतात.

आयएमपीएस

• तत्काळ देयक सेवा ही रिअल-टाइम व्यवहारांसाठी रचना केलेली एक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रणाली आहे.

एनईएफटी

• नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर प्रणाली ही एक व्यापकपणे वापरली जाणारी प्रणाली आहे जी निधी हस्तांतरण करण्यास सक्षम करते. एनईएफटीसाठी कोणतीही किमान किंवा कमाल मर्यादा नाही.

आरटीजीएस

• रिअलटाइम ग्रॉस सेटलमेंट मोठ्या रकमेला त्वरित आणि सुरक्षित पद्धतीने सहजपणे हस्तांतरण करण्याची परवानगी देते. आरटीजीएससाठी किमान निधी हस्तांतरण रक्कम ₹2 लाख आहे.

परिशिष्ट "ए"

डिजिटल सामग्री सादर करणे पॉलिसी आणि मार्गदर्शक तत्त्वे

1. ग्राहक घोषित करतो आणि हमी देतो की, त्याला कोणत्याही किंवा सर्व डिजिटल सामग्रीचा वापर करण्यासाठी अधिकृतता आहे आणि त्यासाठी वैध परवाना आहे तसेच त्यामध्ये असलेले सर्व बौद्धिक संपत्ती हक्क ग्राहकास योग्यरित्या प्राप्त झाले आहेत.

2. ग्राहक येथे सहमती देतो व पुष्टी करतो, तसेच पुढे असे घोषित करतो आणि हमी देतो की, ग्राहकाकडे पुरेसा हक्क व अधिकार आहेत की तो ॲक्सिस बँकेला तसेच तिचे एजंट, सहयोगी आणि सेवा प्रदाते यांना अपरिवर्तनीय, हस्तांतरण न करता येणारा, अनन्य नसलेला,

रॉयल्टी-मुक्त आणि जागतिक स्तरावर लागू होणारा असा हक्क प्रदान करू शकतो, ज्याअंतर्गत ग्राहकाने वापरलेली/अपलोड केलेली कोणतीही डिजिटल सामग्री किंवा तिचा कोणताही भाग, आवश्यक त्या परिमाणात, ॲक्सिस बँकेकडून ग्राहकाला ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे सेवा आणि/किंवा सुविधांचा पुरवठा करण्यासाठी वापरणे, बदल करणे, मुद्रित/अंकित करणे, प्रतिलिपी करणे, साठवणे आणि पुनरुत्पादन करणे शक्य होईल.

3. ग्राहक पुष्टी करतो की त्याने वापरलेल्या/अपलोड केलेल्या डिजिटल सामग्रीमध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व बौद्धिक संपत्ती हक्कांवर त्याचे मालकी हक्क/परवाना आहे आणि पुढे असेही घोषित करतो की तो हे हक्क कायम राखणार आहे. डिजिटल सामग्रीमध्ये अंतर्भूत असलेल्या बौद्धिक संपत्ती हक्कांवरील मालकी/परवाना ग्राहकाकडेच आहे, याची ॲक्सिस बँक दखल घेते आणि ॲक्सिस बँक त्या मालकीच्या/परवानाधारित डिजिटल सामग्रीवर कोणताही हक्क, स्वारस्य किंवा मालकीचा दावा करणार नाही.

4. ग्राहक पुढे असे घोषित करतो की, या अटींनुसार ग्राहकाने अधिकृत केलेल्या प्रमाणे, ॲक्सिस बँक तसेच तिचे एजंट, सहयोगी आणि सेवा प्रदाते यांच्याकडून डिजिटल सामग्रीचा करण्यात येणारा वापर कोणत्याही तृतीय पक्षाच्या बौद्धिक संपत्ती हक्कांचे आणि/किंवा प्रचलित कायदे, नियम किंवा विनियमांचे उल्लंघन करणार नाही.

5. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन वापरून कोणत्याही सेवांचा लाभ घेताना डिजिटल सामग्रीचा वापर/अपलोड करण्यासाठी ग्राहक पूर्णपणे जबाबदार असेल. तथापि, ग्राहकाच्या विनंतीवरून ॲक्सिस बँक ग्राहकाला सेवांचा लाभ घेण्याची परवानगी देत आहे आणि डिजिटल सामग्रीचा ग्राहकाकडून केलेल्या कोणत्याही वापरासाठी ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही.

6. ग्राहक हे मान्य करतो आणि पुष्टी करतो की, ग्राहकाने वापरलेल्या/सादर केलेल्या डिजिटल सामग्रीसंबंधी ग्राहक आणि कोणत्याही तृतीय पक्षामध्ये उद्भवणारा कोणताही दावा किंवा वाद हा ग्राहक आणि संबंधित तृतीय पक्ष यांच्यामध्येच निकाली काढला जाईल आणि अशा दावा किंवा विवादा संदर्भात ॲक्सिस बँकेचा कोणताही संबंध ठेवला जाणार नाही. या संदर्भात ग्राहक किंवा कोणत्याही तृतीय पक्षाला झालेल्या कोणत्याही नुकसान/हानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही आणि त्याचे संचालक आणि कर्मचारी, प्रतिनिधी, एजंट आणि/किंवा सहयोगींसह ॲक्सिस बँकला त्यातून नुकसानभरपाई आणि हानीरहित ठेवेल.

7. ग्राहकाने ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनवर अपलोड केलेली डिजिटल सामग्री ही ॲक्सिस बँक अथवा तिच्या सहयोगी संस्था व सेवा प्रदात्यांच्या प्रणाली, सॉफ्टवेअर, सर्व्हर

इत्यादींसाठी हानिकारक ठरू शकणाऱ्या कोणत्याही स्पायवेअर, मालवेअर, व्हायरस, त्रुटी किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या सामग्रीपासून मुक्त असावी.

डिजिटल सामग्रीच्या वापरासाठी अटी आणि शर्ती

खालीलपैकी कोणतेही घटक असलेल्या डिजिटल सामग्रीस अनुमती दिली जाणार नाही

1. ट्रेडमार्क किंवा कॉपीराईट सामग्री जी प्रसिद्ध किंवा मान्यताप्राप्त आहे, ज्यामध्ये कोणतीही डिजिटल सामग्री किंवा ©, ® किंवा ™ चिन्हे असलेला त्याचा काही भाग, जाहिराती, विशिष्ट ब्रँडच्या उत्पादनांच्या प्रतिमा/ऑडिओ-व्हिज्युअल सह प्रचारात्मक सामग्री आणि टेलिफोन नंबर, यूआरएल, खाते नंबर किंवा ईमेल पत्ता असलेल्या सर्व सामग्रीचा समावेश आहे;
2. ज्यांना सर्वत्र ओळखले जाते अशा प्रसिद्ध व्यक्ती/ संगीतकार/ खेळाडू/ मनोरंजनकर्ते/ सार्वजनिक व्यक्तिमत्त्वे/ कार्टून पात्रे इत्यादींच्या कोणत्याही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल्स;
3. कोणतीही डिजिटल सामग्री जी उत्तेजक, असभ्य, हिंसक, अश्लील, बीभत्स किंवा लैंगिक प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल ज्यात नग्नता, आक्षेपार्ह आणि/किंवा वर्णद्वेष आहे आणि अशा कोणत्याही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल ज्यामध्ये शस्त्रे, हिंसा किंवा बंदुकीसारखी शस्त्रे प्रदर्शित केली आहेत.
4. सांप्रदायिक, असामाजिक किंवा अश्लील वर्तनाचे चित्रण किंवा प्रचार करणारी किंवा भडकावणारी कोणतीही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल.
5. नशा, धुम्रपान, अंमली पदार्थ आणि/किंवा जुगार किंवा तत्सम स्वरूपाचे क्रियाकलाप प्रदर्शित केलेल्या कोणत्याही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल.
6. सामाजिक अशांतता, समाजविघातक विकार किंवा राजकीय किंवा धार्मिक विधाने आणि/किंवा मजकूर किंवा कल्पनाचित्रे ज्यात कायद्याने बंदी घातलेले समूह/दृश्ये दर्शविणाऱ्या कोणत्याही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल सामील आहेत जे धार्मिक किंवा राजकीय विश्वास आणि श्रद्धा यांना भडकावतात.
7. ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशन संदर्भात गोंधळ निर्माण करू शकणाऱ्या कोणत्याही स्वरूपाच्या विषयातील कोणत्याही फोटो/ऑडिओ/ऑडिओ-व्हिज्युअल्स किंवा त्यामुळे उक्त ॲक्सिस मोबाईल ॲप्लिकेशनच्या वापराद्वारे व्यवहाराबाबत फसवणूक होऊ शकते.

8. कोणतीही प्रतिमा/ऑडिओ/ऑडिओ-व्हिज्युअल जे मास्टर कार्ड® किंवा व्हिसा® किंवा इतर पेमेंट नेटवर्क ब्रँड/गेटवे यांना खराबपणे प्रतिबिंबित करू शकतात किंवा यांच्याशी संघर्ष निर्माण करू शकतात.

9. कोणतीही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल जेथे पैसा किंवा चलन केंद्रित/प्रदर्शित केले आहे.

10. ऑलिम्पिक खेळांची ट्रेड नावे, लोगो, घोषवाक्ये किंवा कोणत्याही कार्ड प्रोसेसिंग असोसिएशनच्या ओळखीचा कोणताही संदर्भ (उदा.. व्हिसा, मास्टर कार्ड, अमेरिकन एक्सप्रेस इ.).

11. असभ्य किंवा अश्लीलता दर्शवणाऱ्या कोणत्याही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल्स जे ॲक्सिस बँक, ॲक्सिस बँकेचा लोगो किंवा ॲक्सिस बँक कार्ड, ब्रँड नेम, ट्रेडमार्क इ. चे वाईट पद्धतीने चित्रण करतात.

12. इतर कोणत्याही बँकिंग किंवा वित्तीय संस्थेची नावे, ब्रँड, उत्पादने, सेवा किंवा प्रतिमा दर्शविणारी कोणतीही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल.

13. कोणतीही प्रतिमा/ ऑडिओ/ ऑडिओ-व्हिज्युअल ज्यात कोणतेही प्रतीक, ध्वज, चिन्ह, नावे, लोगो किंवा भारतीय संविधान किंवा इतर कोणत्याही सरकारी संस्थेशी संबंधित कोणतीही सामग्री समाविष्ट आहे.

परिशिष्ट "बी"

कागदपत्रांमध्ये संदर्भित पॉलिसीची लिंक. या कागदपत्रात अनुपस्थित असलेली, परंतु खाली दिलेल्या कोणत्याही लिंकमध्ये उपलब्ध असलेली नियम व अटींची कोणतीही तरतूद या कागदपत्राचा अविभाज्य भाग मानली जाईल.

- ॲक्सिस बँक ग्राहक अधिकार धोरण - https://www.axis.bank.in/docs/default-source/noticeboard/importantnotice/customer--rights-policy.pdf
- ॲक्सिस बँक बचत खाते अटी व शर्ती- https://www.axis.bank.in/docs/default-source/default-document-library/savings-accounts-tnc.pdf?sfvrsn=9a8eb1a3_5
- ॲक्सिस बँक नेट बँकिंग अटी व शर्ती- https://www.axis.bank.in/bank-smart/internet-banking/terms-conditions

- ॲक्सिस बँक तक्रार निवारण पॉलिसी अटी व शर्ती - https://www.axis.bank.in/docs/default-source/default-document-library/grievance-redressal/grievance-redressal-policy.pdf?sfvrsn=3866ba1d_14
- ॲक्सिस बँक ग्राहक भरपाई पॉलिसी बाबत बँकेच्या अटी व शर्ती - https://www.axisbank.com/docs/default-source/default-document-library/Customer-Compensation-Policy.pdf?sfvrsn=4
- ॲक्सिस बँक वचनबद्धता संहिता अटी व शर्ती - https://www.axis.bank.in/docs/default-source/default-document-library/code-of-commitment.pdf?sfvrsn=e16d1812_1